# गोष्टी माझ्या तुझ्या...

संजीवनी कुलकर्णी, मोहन देशपांडे, श्रीनिवास दरक

प्रयास

आरोग्य, ऊर्जा, शिक्षण आणि पालकत्व
या विषयांतील विशेष प्रयत्न

प्रयास आरोग्य गट

rijksuniversiteit groningen
faculteit ruimtelijke wetenschappen

पॉप्युलेशन रिसर्च सेंटर, ग्रोनिंगन, नेदरलँड,

# गोष्टी माझ्या तुझ्या...

© प्रयास आरोग्य गट, पुणे
व
पॉप्युलेशन रिसर्च सेंटर, ग्रोनिंगन, नेदरलँड,

प्रकाशन साल : २०१३

ISBN-978-90-367-6362-2

अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे ४११ ००४,
फोन : २५४४१२३०, ६५६१५७२६, फॅक्स : २५४२०३३७
Email: prayashealth@vsnl.net  Web site: www.prayaspune.org

**मांडणी (विशेष साहाय्य)**
सुरेंद्र कुलकर्णी

**साहाय्य**
अश्विन मधाळे

**मुद्रण**
मुद्रा, पुणे.

**ही पुस्तिका नेदरलँड येथील ग्रोनिंगन विद्यापीठाच्या पॉप्युलेशन रिसर्च सेंटर व एरिक ब्युमिंक फाऊंडेशन यांच्या आर्थिक साहाय्यातून तयार झाली आहे.**

एचआयव्हीला काबूत ठेवण्यासाठी आणि आईकडून बाळाला होऊ शकणाऱ्या लागणीच्या प्रतिबंधनासाठी वापरली जाणारी एआरटी (अँटी रेट्रोव्हायरल औषधे) कधी सुरू करावी, कोणत्या मात्रेत घ्यावी याबद्दलची मार्गदर्शक तत्त्वे जागतिक आरोग्य संघटनेकडून प्रसारित केली जातात. त्यामध्ये वेळोवेळी बदलही केले जातात. या पुस्तिकेत उल्लेखलेले पर्याय जागतिक आरोग्य संघटनेने २०१० मध्ये जाहीर केलेल्या मार्गदर्शनानुसार आहेत.

## कथांमागची कथा...

या पुस्तिकेत सात कथा आहेत. सात या अंकावरून आपल्याला आठवण होते, ती इंद्रधनुष्याच्या सात रंगांची किंवा संगीतातल्या सात सुरांची. रंगांसारख्या किंवा सुरांसारख्याच, या कथाही वेगवेगळ्या आहेत; तरीही आपल्या अनुभवाच्या, ओळखीच्याही आहेत.

या कथांमधल्या व्यक्तिरेखा, म्हटलं तर पूर्णपणे काल्पनिक आहेत; पण त्यातून सामोरे येणारे विषय, त्यातले मुद्दे, हे मात्र अजिबात काल्पनिक नाहीत. या कथांची जन्मकथा अशी आहे : प्रयास या संस्थेत स्त्रियांच्या अनुभवांबद्दलचा एक अभ्यास आम्ही केला. एचआयव्ही असलेल्या, निदान एकदा तरी विवाह झालेल्या आणि त्यामुळे शरीरसंबंधांचा अनुभव असलेल्या स्त्रियांना, त्यांच्या आयुष्यातल्या घटना–प्रसंगांच्या आठवणी सांगायची विनंती आम्ही केली. काय घडलेलं असणार या स्त्रियांच्या आयुष्यात? आपल्यापैकी बहुतेकांच्या आयुष्यात घडतं तेच. लग्न, शरीरसंबंध, गर्भारपण, मूल इ.इ.

आणि त्याशिवाय एचआयव्ही असल्यामुळे या घटनांवर होणारा परिणामही!

आमचाही अंदाज असाच होता. पण बोलल्यावर आम्हाला समजलं, की याच घटनांनी त्या प्रत्येकीच्या आयुष्यात आलेले प्रश्न मात्र वेगवेगळे होते, आणि त्या प्रश्नांना सामोरं जाणं तर अगदी भिन्न–भिन्नच होतं. आमच्या विनंतीला मान देऊन आपल्या वैविध्यपूर्ण आठवणींचं भांडार या स्त्रियांनी आमच्यासमोर ठेवलं, अगदी मनापासून.

अभ्यासाला सुरवात केल्यापासून एक गोष्ट आम्ही ठरवली होती; या अनुभवांच्या मंथनातून आपल्या हाती जे काही येईल, ते स्त्रिया आणि त्यांचे जोडीदार यांच्यासह सर्वांपर्यन्तही पोचवायचं. ही गोष्ट मुद्दाम सांगायची ती अशासाठी, की सामान्यपणे अशा प्रकारच्या संशोधनांचे निष्कर्ष वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये छापले जातात, संशोधकांना ते उपलब्ध होतात. पण हे सारं ज्यांच्या जित्याजागत्या अनुभवांतून आलेलं असतं, त्यावरच बेतलेलं असतं, त्यांच्या पदरी मात्र त्यातून क्वचितच काही पडतं. अर्थात काही संस्था तसा प्रयत्न आवर्जून करतात; आधीच प्रसिद्ध झालेल्या आरोग्यविषयक माहितीपर पुस्तिका सहभाग घेणारांना देतात. तरीही बऱ्याचदा त्यांचं स्वरूप जनसामान्यांना सहज उमगेल असं नसतं. आपल्या मनीचं गुज संशोधकांसमोर मोकळेपणानं मांडणाऱ्यांच्या आपुलकीची बूज ठेवायची, तर हे प्रयत्न अपुरे आहेत, अशी खंत त्यातून उरतेच. तर मग, काय करावं? आम्हाला ह्या संशोधनात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यासाठीच, ही कथांची माला आम्ही तयार केली.

संशोधनाच्या निष्कर्षांसारख्या रुक्ष विषयवस्तूला कथांसारख्या आवडीच्या रूपातून आपल्यासमोर आणण्यामागे एक विचार आहे. आपण सगळे आपल्याला स्वतःला आणि आपल्या ओळखीतल्या नात्यातल्या इतरांनाही कथांमधूनच ओळखतो, असं म्हटलं तर गैर होणार नाही. आपल्या आयुष्यात घडून गेलेल्या घटना, आपल्याला आलेले आणि आजही येत असलेले अनुभव, आणि भविष्याबद्दलच्या आपल्या आशा–आकांक्षा या सगळ्या कथांचीच मिळून 'आपली' अशी एक कथा तयार होत असते. ह्या कथाच आपल्या आयुष्याला, आपल्या अस्तित्वाला अर्थ देतात. आमच्या अभ्यासात स्त्री–जीवनातल्या आकांक्षांची, आनंदकल्पनांची, व्याकूळवेदनांची मन हरपून टाकणारी अनेक रूपं आमच्यासमोर आली. त्यातूनच ह्या कथा जन्मलेल्या आहेत. म्हणून या सगळ्याच कथा स्त्रीकेंद्रितही आहेत.

या कथांच्या नायिका अगदी साध्यासुध्या स्त्रिया आहेत. कुणी जगावेगळ्या नाहीत. त्यांची व्यक्तिमत्त्वं, त्यांना मिळालेल्या शिक्षणाच्या संधी, सामाजिक आर्थिक परिस्थिती मात्र कथाकथांमध्ये वेगवेगळी आहे, तसेच त्यांना पडलेले प्रश्नही वेगवेगळेच आहेत. मात्र एक साम्य या कथानायिकांमध्ये आहे : त्या सगळ्याजणी विलक्षण कौशल्यानं आपापल्या परिस्थितीला सामोऱ्या जातात. ह्यामध्ये त्यांचा जोडीदार, त्यांचा सखा–सजण कधी त्यांच्या हातात हात गुंफून जोडीनं चालत असतो; कधी त्यांच्या आड लपत असतो, तर कधी, त्यांची किंवा स्वतःची फसवणूक करत असतो. तरीही त्यांच्या नात्यांमधल्या अबोल जागा निरखताना मानवी ऋणानुबंधांची आणि प्रीतभावनेची ताकद – जात, धर्म, सामाजिक स्तर आणि एचआयव्ही सारखा आजार याहून फार वरची आहे याची आपल्याला जाणीव होते. रंगसुरांप्रमाणेच मानवी भावजीवनातलं वैविध्यही या सात कथांमधून पाझरत आपल्या मनात पोचतं. परिस्थितीच्या सोसाट्यात हेलकावे खाणाऱ्या आपल्यापैकी प्रत्येकाचं जगण्याचं बळ वाढवतं, असं मला वाटतं.

एचआयव्हीसह किंवा एचआयव्हीशिवाय पण उमेदीनं जगणाऱ्या सगळ्याच स्त्रियांचा आणि त्यांच्या जोडीनं उभ्या राहणाऱ्या जोडीदारांचाही हा सत्कार आहे. ही कल्पना प्रत्यक्षात येण्यामागे या अभ्यासातील माझ्या सहकारी व मार्गदर्शक डॉ. संजीवनी कुलकर्णी यांचा महत्त्वाचा वाटा आहे. या कथा लिहिण्याचं श्रेय त्यांना आहे.

आपल्याला एखादी माहिती कुणी सांगितली तर माणूस विसरतो, पण ती जर अनुभवातून आलेली असेल, तर आपण कधीच विसरत नाही. हा अनुभव नेहमीच आपला स्वत:चा असावा लागत नाही. किंबहुना अशा कथा वाचताना, त्यामधल्या व्यक्तिरेखांशी जेव्हा आपली ओळख होते, आपल्या अनुभवांशी जुळणारं कुणी माणूस आपल्याला कथेतून भेटतं, तेव्हा कदाचित प्रश्नांची गाठ उकलण्याचं तंत्र आपल्या नकळत आपल्याला उमगतं.

आपल्या संस्कृतीत मातृत्व हे स्त्रीजीवनाच्या केंद्रस्थानी मानलं जातं. बाई असण्याचं सार्थक आई होण्यातच असतं, असं आपण मानतो. पण ती बाई, ही एक माणूस असते. तिलाही मन असतं, भावना असतात, हे विसरलंच जातं. एचआयव्ही असलेली बाई किंवा आई म्हटल्यावर सर्वात महत्त्वाचा मुद्दा तिच्याकडून तिच्या बाळाला लागण होऊ नये, हाच मानला जातो; बाईच्या बाईपणाला, तिच्या शरीराला, तिच्या जाणिवेला त्यात फारसं स्थान दिलं जात नाही. या कथांमध्ये मात्र स्त्री–पुरुषजीवनातल्या विविध प्रश्नांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आजच्या काळात एचआयव्ही असलेल्या जोडप्यालाही मूल हवं असेल, तर ते होण्याचा निर्णय अगदी बिनघोरपणे घेता येतो. तसेच त्यावेळी किंवा यानंतर मूल नको असेल, तर त्यासाठीही सुविधा उपलब्ध असतात. त्या कोणकोणत्या, याबद्दलची माहितीही या पुस्तकात आवश्यक तिथे समाविष्ट केली आहे. एचआयव्ही असलेल्या स्त्रीपुरूषांना आपल्या जननक्षमतेचा म्हणजे मूल हवे की नको, हवे तर ते केव्हा, कसे इ. ठरवण्याचा अधिकार सुविहीतपणे बजावताना या पुस्तकाची चांगली मदत होऊ शकेल.

माझ्या सहकारी श्रीमती नेहा वैद्य आणि डॉ. तृप्ती दरक या दोघींनी या अभ्यासात सहभागी झालेल्या स्त्रियांशी प्रत्यक्ष संवाद साधला. त्यांच्या सहकार्यावरच प्रकल्पाची योजना पूर्ण झाली.

लेखिका डॉ. संजीवनी कुलकर्णी या प्रयास आरोग्य गटाच्या समन्वयक आहेत. एचआयव्हीच्या क्षेत्रात गेली दोन दशकं काम करत आहेत. संशोधनातून निघालेल्या रोकड्या माहितीतून या रसपूर्ण कथा त्यांनी कशा निर्माण केल्या, हे त्यांचं त्यांनाच माहीत.

या लेखनाला जणू आंतरिक साथ म्हणावी अशी डॉ. मोहन देशपांडे यांच्या चित्रांनी दिलेली आहे. या निष्णात आणि अनुभवी कलाकाराची साथसंगत चित्रांपलीकडे कथांमध्येही झिरपलेली आहे.

या सर्वांची मदत आणि आपुलकी आभार मानण्यापलीकडचीच आहे.

या निमित्ताने मला डॉ. विनय कुलकर्णीचे, म्हणजे आमच्या सरांचेही आभार मानायचे आहेत. आजवरच्या माझ्या सर्वच प्रकल्पांत त्यांचं मार्गदर्शन आणि पाठीशी असणं, माझ्यासाठी फार मोलाचं आहे.

नेदरलंड येथील ग्रोनिंगन विद्यापीठाच्या स्पाशियल सायन्सेस विद्याशाखेच्या प्रमुख प्रो. इंगा हुटर ह्या या संशोधनप्रकल्पाच्या मार्गदर्शक आहेत. यांच्या प्रोत्साहनाच्या बळावरच हा प्रकल्प मला पूर्ण करता आला. त्यांच्यासारखी संवेदनशील आणि निष्ठावंत शिक्षिका मिळणं ही माझी जमेची बाजू आहे.

ही पुस्तिका आपल्याला आवडावी, उपयोगाची वाटावी अशी आमची सर्वांची मनापासून इच्छा आहे. खरोखरच तसं होतं का, हे मात्र वाचकांनीच ठरवायचं आहे.

आपला नम्र

**डॉ. श्रीनिवास दरक**

# मंदा–सुभाष



दोघांनाही एचआयव्ही असल्याचं कळलं, तेव्हा मंदा रडरड रडली, पण सुभाषनं तिची समजूत काढली. ''आता औषधं असतात, आपण नीट औषधं घेऊ, कंडोम वापरू, चांगलं जगू,'' तो पुन्हापुन्हा तिला म्हणाला.

''झालाच कसा पण आपल्याला एचआयव्ही?'' झोपलेल्या नवऱ्याला जागं करून एका रात्री मंदानं रडत विचारलं. सुभाषनं काही न बोलता तिला फक्त जवळ घेतलं. मंदा रडत रडतच त्याच्या कुशीत शिरली. तो तिला थोपटत राहिला. तिला त्याच्यावर रागवायचं होतं, त्याचे कुणाशी संबंध होते का, असं विचारायचं होतं. पण तो इतक्या प्रेमळपणे तिला थोपटत होता की तिला काही विचारताच आलं नाही.

हे एचआयव्हीचं प्रकरण बाजूला ठेवलं, तर एरवी मंदा स्वत:ला नशिबवानच समजत असे. सुभाष हुशार होता, गरिबीमुळे, शिक्षण अपुरं राहिलेलं असलं तरी त्यानं नोकरीत आपलं स्थान निर्माण केलं होतं. विशेष म्हणजे, त्याबद्दल त्याला अजिबात गर्व नव्हता. नोकरीवरून घरी आला, की तो मंदाला घरच्या कामांत मदतीला लागायचा. मंदावर कधी ओरडतसुद्धा नसे. इतका सौम्य, समजूतदार स्वभावाचा पती आणि आपल्या संसारवेलीवर फुललेली दोन फुलं, सौरभ आणि साक्षी; तिच्या सुंदर संसाराचा तिला अभिमानच वाटायचा.

या इतक्या चांगल्या माणसाला एचआयव्ही झालाच कसा, असाच प्रश्न तिच्या मनात यायचा. झाला असेल कदाचित इंजेक्शनमधून त्याला, नाहीतर असंही असेल की कदाचित तिलाच झाला असेल कशातून तरी आणि मग बायकोकडून नवऱ्याकडे गेला असेल.

एचआयव्हीची अशी आठवण जरी मनात आली तरी ती निराश होऊन जाई.

नशीब, दोघा मुलांपैकी कुणालाच नव्हता. मुलांवरून तिला आठवलं, आजच्या काळात, दोन मुलांवर आणखी तिसरं मूल आपल्याला नको, सुभाष म्हणायचा. साक्षीच्या जन्मानंतर त्यानं आग्रह करून डॉक्टरांकडून तिला तांबी बसवून घ्यायला लावली होती. तांबी बसवून तीन वर्ष झाली होती, आता ती काढून मंदानं फॅमिली प्लॅनिंगचं ऑपरेशन करून घ्यायचं असंही त्यांचं ठरलं होतं. पण हे एचआयव्हीचं कळल्यावर काही दिवस इतर काही सुचलंच नाही, म्हणून ऑपरेशनचा विचारही जरा मागेच पडला.

डॉक्टरांनी प्रत्येक शरीरसंबंधाच्या वेळी कंडोम वापरायला सांगितला होता. 'आपण कंडोम वापरू,' असं सुभाषही म्हणाला होता. तांबी लावून तीन वर्ष होत आली होती, ती आता काढायला झाली होती. शिवाय 'कंडोम वापरायचा आहेच, तर तांबी कशाला,' असा विचार करून मंदानं ती काढून घेतली. ' कंडोम वापरायचा आहेच, तर ऑपरेशन कशाला,' असं सुभाषचं मत होतं. मंदालाही ते पटलं.

एचआयव्हीचा नुसता विषय जरी मनात आला तरी मंदाला खूप रडू यायला लागायचं, निराश वाटायचं. पण ती अशी निराश दिसली की सुभाष तिची खूप काळजी घ्यायचा. तिचे लाड करायचा. काही दिवसांनी ती सावरली. एचआयव्ही असल्याची जाणीव नाहीशी झाली नाही, पण त्याचा व्रण काहीसा बुजल्यासारखा झाला. आयुष्य पुन्हा नेहमीसारखं सुरू झालं. कंडोम वापरायला त्या दोघांनाही मनातून आवडायचं नाही, नको वाटायचं. आपण कंडोम वापरत आहोत याचं कारण आपल्याला एचआयव्ही आहे, असं मनात यायचं, मग ते विसरायला कंडोमही टाळावासा वाटायचा. ' एखाद्यावेळी न वापरल्यानं काय होतंय! माहीत नव्हतं, तेव्हा कुठं वापरत होतो?' असं वाटायचं.

काही दिवसांनी तिची पाळी चुकली. तिनं प्रथम फारसं लक्षच दिलं नाही. अनेकदा कंडोम वापरतही असत ते, त्यामुळे दिवस राहण्याची शक्यता तशी तिला वाटतच नव्हती. पण आणखी दोन महिने उलटले तरी पाळी आलीच नाही.

मग मात्र डॉक्टरांकडे जावंच लागलं. डॉक्टरांकडे गेल्यावर त्यांनी दिवस राहिले असल्याचं म्हटलं तेव्हा जरा आश्चर्यच वाटलं तिला.

डॉक्टरांकडून गोळ्या घेऊन तिनं सरळ गर्भपात करवून घेतला. खूप रक्तस्राव होत होता, म्हणून एक दिवस तिनं मुलांना बहिणीच्या घरी पाठवून शांत विश्रांती घेतली. सुभाषही हाफ–डे टाकून घरी आला. तिच्यासाठी आणलेला फळांचा रस पेल्यात ओतून समोर धरत म्हणाला,

''मंदा, माझ्यामुळे किती त्रास होतो ग तुला!''

सुभाषच्या प्रेमळ वागण्यानं मंदा खरोखर भारावून जात असे. तिचे वडील, भाऊ, नातेवाईक, शेजारपाजारचे अनेक पुरूष तिनं बघितले होते. त्यातले क्वचितच कुणी असे मऊपणानं बायकोशी वागत असत.

'लागला एकदा करावा गर्भपात आपल्याला, तर एवढं काय त्याचं! सुभाषना जराही अपराधी वाटून द्यायचं नाही. इतर बायकांना किती काय सहन करावं लागतं. आपलं नशीब थोर, म्हणून आपल्याला इतका चांगला माणूस भेटलाय.' तिनं ठरवूनच टाकलं! या गर्भपाताचीच काय, पण एचआयव्हीचीही आठवण सुभाषला येऊ नये अशी वागायला लागली मंदा!

काही महिन्यांनी मंदाची पाळी पुन्हा एकदा चुकली, पुन्हा तोच सगळा प्रकार घडला. आता मात्र पुन्हा एकदा त्याच डॉक्टरकडे त्याच कारणानं जायची तिला फार लाज वाटली. सुभाषनं मग त्याच्या एका मित्राच्या ओळखीनं गर्भपाताच्या गोळ्या आणल्या. तिनं त्या घेतल्या, तरी यावेळी गर्भपात काही नीट झालाच नाही. मग एका हॉस्पिटलात जाऊन पिशवी धुऊन घ्यावी लागली. हॉस्पिटलमधून घरी परतण्यापूर्वी डॉक्टरांनी भेटून जायला सांगितलं होतं. भेटल्यावर ते म्हणाले,'' जाण्यापूर्वी कौन्सलरना जरूर भेटा.''

मंदाला वाटलं, शाळेत असताना आपल्या हातून काही मोठी चूक झाली की हेडसरांना भेटायला पाठवत, तसंच आहे इथेही. आपली चूक झालेली आहे, आता वेगवेगळ्या प्रकारे ते कौन्सलर किंवा डॉक्टर प्रेमळ शब्दात आपल्याला समजावून सांगणार, म्हणजेच रागवणार.

''कशाला जायचं कौन्सलरकडे?'' डॉक्टरांच्या खोलीतून बाहेर येतायेता मंदा सुभाषच्या कानात पुटपुटली. ''जाऊन तर येऊ, बोलले काही तर बोलले, त्यानं काय आपल्या अंगाला भोकं पडतात का?'' सुभाषनं हसून तिला धीर देत म्हटलं.

कौन्सलरच्या खोलीत शिरल्यावर ते हसून 'या' म्हणाले तेव्हा पहिल्यांदा मंदाला प्रतिसादाचं साधं हसताही आलं नाही. पण कौन्सलर प्रेमळ होते.

त्यांनी हसतखेळत गप्पा मारायला सुरूवात केली.



त्यांनी कंडोम वापरण्याची पद्धत विचारली, त्यात काही सुधारणा सुचवल्या. ''शरीरसंबंधांच्या अगदी सुरवाती–पासून कंडोम वापरायला हवा,'' ते म्हणाले, फक्त कंडोम वापरला तर पंच्याऐंशी टक्के वेळेला गर्भारपण राहत नाही पण तरी पंधरा टक्क्यांची तूट उरतेच. यासाठी आणखी एखाद्या कुटुंबनियोजनाच्या साधनाचाही वापर तुम्ही करायला हवा. यापूर्वीच कुणीतरी तुम्हाला हे सांगायला हवं होतं. तुम्हाला हे माहीत असतं, तर असा त्रास झालाच नसता.'' मग त्यांनी गर्भनिरोधक गोळ्या नियमित घेण्याचा किंवा पुन्हा एकदा गर्भाशयात बसवण्याच्या उपकरणाचा–तांबीचा– वापर सुचवला. अगदी क्वचित कंडोम फाटण्यासारख्या कारणानं गर्भारपणाची काळजी वाटलेली असली, तर संबंधांनंतर लवकरात लवकर (५ दिवसांच्या आत) गोळ्या घेण्याचाही एक पर्याय होता. दुसऱ्या वेळी कदाचित तोही वापरता आला असता, हेही सांगितलं. कौन्सलर रागावले तर नाहीतच, पण तुम्हाला माहीत नव्हतं म्हणून असं झालं, माहीत असतं तर तुम्ही काळजी घेतलीच असती, असं म्हणाले, म्हणजे त्यांनी आपल्याला बेजबाबदारही ठरवलेलं नाही, हे पाहून मंदाला जरा हायसं वाटलं. ह्या माणसासमोर खरं काय, ते सांगून टाकावं असं वाटून ती म्हणाली,

'' एखाद्या वेळेस अगदी कंडोम वापरायला नको वाटलंच तर,... पण तरी आम्ही तसे दिवस मोजूनच संबंध करत होतो, खरं पाहायला गेलं तर. ''

कौन्सलर हसले. '' तुम्ही वापरलीत, ती म्हणजे सुरक्षित दिवसांची पद्धत. म्हणजे ज्या नेमक्या काळात गर्भ राहण्याची शक्यता जास्त असते ते दिवस टाळून संबंध करण्याची ही पद्धत असते. पण लक्षात ठेवा, ही पध्दत तशी फारशी विश्वासार्ह नसते बरं का. ''

''थांबा, आपण ह्या पुस्तकात पाहू '' असं म्हणून त्यांनी एक पुस्तक काढलं आणि पुस्तकातला भाग स्वतःच मोठ्यानी वाचायला सुरूवात केली.

''प्रत्येक बाईच्या मासिकचक्रावर तिचे सुरक्षित दिवस कोणते हे अवलंबून असते, हे नेमके दिवस कोणते, हे दिवस मोजून अगदी नेमकेपणे सांगणे अगदी अवघड असते. काही आडाखे असले, तरी त्यातला अंदाज कधीतरी चुकतो, दुसरे म्हणजे पुरूषाच्या धातूतून स्त्री–शरीरात पोचलेले शुक्राणू दोन ते पाच दिवसांपर्यंत जिवंत राहू शकतात,''

मग पुस्तक मिटून बाजूला ठेवत ते म्हणाले, ''आणि त्यामुळे संबंधांनंतरही काही दिवस स्त्रीच्या शरीरात जिवंत राहिलेले शुक्राणू विकसित होऊन आलेल्या स्त्री–बिजांडाला गाठतात, त्यामुळेही आपण काळजी घेऊनही दिवस राहू शकतात. म्हणून ही सुरक्षित दिवसांची पध्दत फारशी विश्वासार्ह नाही. कंडोम तर वापरायचाच, पण त्याशिवाय वापरायची पद्धत ही सुरक्षित दिवसांची असू नये. ''

मंदानं डोक्याला हात लावला.

सुभाष म्हणाला, ''पण त्यापेक्षा आपण आधी ठरवलंच होतं, तसं ऑपरेशनच करून टाकू ना तुझं मंदा.''

''आधीच हवं होतं करायला आपण.'' सुभाषच्या म्हणण्याला होकार देत, मंदानं कौन्सलरकडे पाहिलं. पण त्यांना काहीतरी वेगळं सांगायचं असावं असं तिला वाटलं, म्हणून खात्री करून घ्यायला ती कौन्सलरना म्हणाली, ''बरोबर आहे ना? '' कौन्सलर म्हणाले, ''या पुढे मूल नको, हे जर तुमचं पक्कं ठरलेलं असेल, तर ऑपरेशन हाच उत्तम उपाय आहे. स्त्रीचं किंवा पुरूषाचं कुणाही एकाचं ऑपरेशन करता येतं. पण मला असं म्हणायचंय, की त्यातही पुरूषांचं नसबंदी–ऑपरेशन तुलनेनं सोपं, कमी वेळाचं असतं. त्याचा त्रासही फारसा होत नाही.''

मंदा यावर काहीतरी बोलणार होती, त्याआधीच सुभाष तिच्याकडे प्रेमानं पाहात कौन्सलरला उद्देशून म्हणाला, ''पण मग, आम्हीही तसंच करू की. मंदाचं ऑपरेशन न करता माझं करून घेऊ आपण. असं बघ मंदा, बाळंतपणाचे कष्ट तुलाच घ्यावे लागलेत तर आता शस्त्रक्रियेची जबाबदारी तरी मी घ्यायला हवी.''

मग कौन्सलरकडे वळून आणखी हसत तो पुढे म्हणाला, ''नाही का, काय हो?''

मंदाला वाटलं, किती समजूतदार आहे आपला नवरा!

''पण कुणी म्हणतात, की नंतर पुरूषाला जरा अशक्तपणा जाणवतो, तसं असेल तर माझंच करा ऑपरेशन.'' ती मध्येच म्हणाली.

कौन्सलर हसले, मान हलवून म्हणाले, ''नाही हो, त्याची काहीच काळजी करू नका. पुरुषांची शस्त्रक्रिया अगदी सोपी असते. त्यानं अशक्तपणा वगैरे काही येत नाही. शिवाय, ते अगदी छोटं ऑपरेशन असतं, फक्त पंधरा मिनिटांचं. त्यासाठी हॉस्पिटलमध्ये भरतीदेखील व्हावं लागत नाही. मात्र त्यानंतर अठ्ठेचाळीस तास विश्रांती घ्यायची की बास. हां पण, ऑपरेशन झाल्यावरही तुम्हाला अगदी नियमितपणे निरोध तर वापरायचाच आहे हां, दिवस राहू नयेत म्हणून नाही, पण आपल्या एचआयव्हीनं पुन्हा एकमेकांच्या शरीरात शिरून आजारातली गुंतागुंत वाढवू नाही, म्हणून. शिवाय ऑपरेशननंतर तीन महिनेपर्यंत अधिक काळजी घ्यायलाच हवी. नाहीतर, नळी कापायच्या आधीच वीर्यकोशात येऊन

बसलेल्या शुक्राणूंमुळे पुन्हा एकदा ...गर्भधारणा होऊ शकेल आणि ...'' असं म्हणून डोळे मोठे करत मंदा–सुभाषकडे बघून एखाद्या मित्राप्रमाणे निर्मळ चेष्टा करत ते मनमोकळं हसले. सुभाषही त्यात सामील झाला.

अंग शहारून मंदा म्हणाली, ''आता पुन्हा? छे, नाही ग बाई!''

## अगदी नियमितपणे कंडोम वापरा असं डॉक्टर/ कौन्सलर का सांगतात?

- जर दोघांनाही एच.आय.व्हीचा संसर्ग असेल तर लैंगिक संबंधातून शरीरातील एच.आय.व्ही विषाणू किंवा इतर लिंगसांसर्गिक आजारांचे जंतू एकमेकांच्या शरीरात जाऊ शकतात. ते एच.आय.व्हीच्या वेगळ्या प्रजातींचे किंवा औषधे पचवून त्यांना सरावलेले विषाणू असू शकतात. त्यामुळे दिलेल्या उपचारांना दाद न देणारे विषाणू वाढून परिस्थिती अवघड होऊन बसते.
- कंडोम हे एकमेव असे साधन आहे ज्यामुळे हा धोका टाळता येतो. त्यामुळे कुटुंबनियोजनाची इतर कोणतीही पद्धत वापरत असाल तरीही कंडोम नियमितपणे वापरायला हवा
- कंडोम वापरण्याने एचआयव्ही व इतर लिंगसांसर्गिक आजारांनाही प्रतिबंध होतोच; त्याशिवाय गर्भनिरोधनही होते.

## कंडोम कसा वापरावा?

- कंडोम प्रत्येक शरीरसंबधांच्यावेळी आणि शरीरसंबंधांच्या अगदी सुरुवातीपासून वापरायला हवा.
- प्रत्येकवेळी नवीन कंडोम वापरावा.
- कंडोमचे पाकीट थंड व कोरड्या जागी ठेवावे. उन्हात किंवा उष्णता लागेल अशा जागी ठेवू नये.
- कंडोमवर ते केव्हापर्यंत वापरण्यास योग्य आहेत, ही तारीख लिहिलेली असते. ती जरूर पाहावी. जुने व तारीख उलटून गेलेले कंडोम वापरु नयेत.
- काही अभ्यासांवरून असे लक्षात आले आहे, की कंडोम वापरण्यासंदर्भात जोडप्यांमध्ये संवाद होत असेल, तर नियमित कंडोम वापरण्याची शक्यता वाढते. त्यामुळे आपल्या जोडीदाराशी कंडोमबद्दल जरूर बोला.
- कंडोम घेताना त्याला वंगण असलेलाच घ्यावा. तेल, ग्रीस किंवा व्हॅसलीन यासारखे वंगण वरून वापरू नये.

**जर तुम्हाला व तुमच्या जोडीदाराला यानंतर भविष्यात कधीही मूल नको असेल तर.....
कायमस्वरूपी गर्भनिरोधनाचा विचार करणे चांगले.**

## पुरुषांची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया- नसबंदी - नव्हे नळीबंदी!

- कुटुंबनियोजन करण्यासाठी पुरुषांचीही शस्त्रक्रिया करता येते, तिला नसबंदीची शस्त्रक्रिया असे म्हणतात. खरे तर या शस्त्रक्रियेत कोणतीही नस कापली जात नाही. या शस्त्रक्रियेमध्ये अंडकोश काढले जात नाहीत.
- शुक्राणू वाहून नेणाऱ्या नलिका कापून त्यांची दोन्ही बाजूची टोके दोऱ्याने बांधून टाकली जातात. त्यामुळे त्यानंतरचा धातू हा शुक्राणूविरहित असतो. त्यामुळे ह्या शस्त्रक्रियेला नळीबंदीची शस्त्रक्रिया म्हणणे योग्य ठरेल.
- शुक्राणू वाहून नेणाऱ्या नलिकांपर्यंत पोहचण्यासाठी वृषणकोशाच्या वरच्या बाजूला फक्त दोन छोटे छेद केले जातात.
- आता तर ही शस्त्रक्रिया बिनटाक्याचीही करता येते.
- ही कुटुंबनियोजनाची सर्वात सहज व परिणामकारक पध्दत आहे. ह्यामुळे पुरुषाला कुटुंबनियोजनाच्या कार्यात एरवी न मिळालेली जबाबदारी घेण्याची एक सुसंधीच मिळते.
- हया शस्त्रक्रियेसाठी इस्पितळात भरती होण्याची गरज नसते.
- शस्त्रक्रियेनंतर दोन दिवस विश्रांती घ्यावी लागते व त्यानंतर रोजची हलकी कामे करता येतात.
- एक आठवड्यानंतर सर्व दैनंदिन कामे नेहमीप्रमाणे करता येतात.
- ह्या शस्त्रक्रियेमुळे लिंगाच्या ताठरण्यावरही काही परिणाम होत नाही व लैंगिक संबंधांमध्येही काही उणेपणा राहत नाही.
- ह्या शस्त्रक्रियेनंतर, पुढील तीन महिन्यांसाठी कुटुंबनियोजनाची वेगळी पध्दत वापरणे गरजेचे असते. कारण शस्त्रक्रियेपूर्वी जे शुक्राणू तयार होऊन वीर्यकोशात पोहोचलेले असतील ते नाहीसे होण्यासाठी तेवढा वेळ लागतो.
- ही शस्त्रक्रिया उलटायची झाली तर नसबंदीच्या वेळेस शुक्राणू वाहून नेणाऱ्या नलिकेचा बांधलेला किंवा कापलेला भाग पुन्हा जुळवावा लागतो. अर्थात त्यानंतरही गर्भ राहीलच याची हमी देता येत नाही.
- या पद्धतींमुळे एच.आय.व्ही. किंवा इतर लिंगसांसर्गिक आजारांपासून संरक्षण मिळत नाही.

**कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया झाल्यानंतरही
एच.आय.व्ही.ची लागण असलेल्या जोडप्यांनी निरोधचा वापर करायलाच हवा.**

## स्त्रियांची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया

- हया शस्त्रक्रियेमध्ये स्त्री–बीज वाहून नेणाऱ्या नलिका दोऱ्याने किंवा रबराने बांधल्या जातात व त्यामुळे स्त्रीबीज गर्भपिशवीपर्यंत पोहचत नाही.
- शस्त्रक्रियेत स्त्रीबीज गर्भाशयात वाहून नेणाऱ्या नलिकांपर्यंत पोहचण्यासाठी पोटावर एक किंवा दोन ठिकाणी छेद घेऊन एखादा टाका पडतो, यालाच बिनटाक्याची शस्त्रक्रिया म्हणतात.
- ही शस्त्रक्रिया सुरक्षित असून त्यामुळे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.
- मात्र ह्या शस्त्रक्रियेसाठी पुरुषांवरच्या शस्त्रक्रियेच्या तुलनेने अधिक वेळ लागतो, शस्त्रक्रियेच्या नंतर विश्रांतीचीही गरजही अधिक असते.
- अ सते.

**कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया झाल्यानंतरही एच.आय.व्ही.ची लागण असलेल्या जोडप्यांनी निरोधचा वापर करायलाच हवा.**

## शस्त्रक्रियेचा निर्णय घेताना...

- कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करावी अथवा नाही, हा त्या जोडप्याचा निर्णय असावा.
- या निर्णयाबद्दल इतरांना काय वाटते, त्यांची मते काय आहेत हे जाणून घ्यायला हरकत नाही. पण तुमच्या वतीने तुमचा जोडीदार एकट्याने, किंवा कुटुंबातील इतर सदस्य, आरोग्यसेवक, डॉक्टर किंवा इतर कोणीही व्यक्ती हा निर्णय घेऊ शकत नाहीत.
- कुटुंबनियोजनाबद्दल आरोग्यसेवा देणाऱ्यांनी शस्त्रक्रिया करून घेण्याचा निर्णय हा त्या व्यक्तीने स्वेच्छेने घेतलेला निर्णय आहे याची खात्री करून घ्यावी. ही त्यांची जबाबदारीच आहे
- एच.आय.व्ही.ची लागण असल्यामुळे डॉक्टर आपल्यावर ही शस्त्रक्रिया करण्यास नकार देतील, अशी भीती काही जोडप्यांना वाटते. प्रत्यक्षात एच.आय.व्ही.ची लागण आहे म्हणून कुठलेही डॉक्टर कुठलीही आरोग्यसेवा नाकारू शकत नाहीत. पण तरीही वास्तवात असे अनुभव काहींना आलेले आहेत. शस्त्रक्रिया कोठे करावी, याबद्दल तुम्ही तुमच्या समुपदेशकाशी बोलून ठरवू शकता. सरकारी दवाखान्यांमध्ये ही शस्त्रक्रिया मोफत केली जाते.

# हव्वा–हमीद

हमीदची प्रकृती आता सुधारत होती. वर्षभरापूर्वी त्याला टीबी असल्याचं निदान झालं होतं. तेव्हाच त्याला एचआयव्हीचा आजार असल्याचंही निघालं होतं. डॉक्टरांनी त्याला दोन्ही आजारांची औषधं सुरू केली होती. हमीदला एचआयव्ही असल्याचं कळल्यावर डॉक्टरांनी लगेचच त्याच्या बीबीला– हव्वालाही एचआयव्हीसाठी रक्ताची तपासणी करून घ्यायला हवी, असं सांगितलं होतं. पण हव्वानं तेव्हा तपासणी करून घेतलीच नाही. सासरच्या लोकांनीही त्यात काही लक्ष घातलं नाही. 'हव्वाचीही तपासणी करा' असं हमीद म्हणत होता पण तो खूपच आजारी होता, त्याच्याकडे कुणीच लक्ष दिलं नाही.

.''तुम्हे पहेले थोडा अच्छा तो लगने लगे, फीर करूंगी मै वो तपासणी!' हव्वानंही त्याला म्हटलं. डॉक्टरांकडे नियमितपणे जाणं, हमीदला सगळी औषधं नीट देणं हे मात्र हव्वा स्वत: लक्ष देऊन करत असे. असे सहा महिने गेल्यावर, हमीदला दाखवायला नेलं असताना डॉक्टरांनी पुन्हा एकदा तिच्या तपासणीबद्दल विचारलं.

तिनं अजूनही तपासणी केलेली नाही हे ऐकून डॉक्टर जरा रागावलेही. मग मात्र तिनं तपासणी करून घेतली. रक्ताचा रिपोर्ट लगेच अर्ध्या तासात मिळणार होता. पण तो अर्धा तास हव्वानं कसा घालवला, हे हव्वालाच माहीत. हमीदही सोबत होताच. हव्वाला एचआयव्ही होता. रिपोर्ट कळल्यावर दोघांनाही रडू फुटलं.

नशीब, सास–ससूर कोणी बरोबर नव्हते.

''या अल्ला, ऐसी कौनसी गलती की मैने, क्यौं सजा दे रहे हो मुझे?'' हव्वा घरी परतताना स्वत:शीच म्हणाली.

दवाखान्यातून परतलेले मुलगा–सून दोघंही मायूस झालेले बघून 'काहीतरी गडबड आहे' हे समजून, सवयीनं त्याची जबाबदारी हव्वावरच ढकलत हमीदची अम्मी तिला म्हणाली, ''क्या हुआ अब? तू जबसे आई है ना घरमें, कुछ ना कुछ बुराही हो रहा हैं.'' हव्वानं दाताखाली ओठ दाबला आणि हमीदकडं बघितलं. त्यानं हव्वाचा हात प्रेमानं क्षणभर हातात धरला आणि तो पुटपुटला, ''चूप बैठ, उसको कुछ मत बता.''

त्या रात्री, ''आपली दु:खं आपण भोगू, पण तुला ही बिमारी असल्याचं आपण घरच्यांना अजिबात सांगायचं नाही.' असं हमीदनं सुचवलं. हव्वालाही ते पटलं. सासरच्यांनी नेहमीसारखा सगळा दोष तिच्याच माथी मारला असता.

दोन वर्षांपूर्वी शादी झाल्यापासून हमीदला काही ना काही बिमारी होतीच. अगदी सुरवातीचे दोनचार महिने सोडले, तर मनात असूनही शरीरसंबंधांचा उत्साहसुद्धा हमीदजवळ बहुदा नसेच. पण तरी तेवढ्यातूनही हव्वाला एचआयव्ही तर झालाच होता, आणखी वर सासरच्या मंडळींची बोलणी खावी लागली असती. सासरच्यांच्या बोलण्याचं तिला एरवी फार वाटलं नसतं. तिच्यासारख्या सगळ्याच स्त्रियांना ती खावी लागतात, पण....

लग्नाबद्दल तिच्याही काही अपेक्षा होत्या. कष्टांना हरकत नव्हती, पण आपल्या पतीसह आपण सुख भोगावं, आपल्याला एखादा नन्हासा प्यारासा बच्चा असावा.. दोघांनी त्याचे लाड करावे, त्याला खूप शिकवावं, अशी तिची कल्पना होती. पण वाट्याला आलेली परिस्थिती तर वेगळीच दिसत होती. हमीदला एचआयव्ही असल्याचं कळल्यावर प्रत्येक वेळी कंडोम वापरणं अगदी आवश्यक असल्याचं दवाखान्यातल्या कौन्सलरनं त्यांना सांगितलं होतं. आणि दवाखान्यात सांगितलेल्या सूचना तंतोतंत

पाळण्याबद्दल हव्वाचा कटाक्षही असायचा. पण त्याचा अर्थ, आपल्याला मूल होणारच नाही, असा घ्यायचा की काय, असा विचार मनात आल्यावर मात्र तिला ती कल्पनाही असह्य झाली. तिच्या घरचे, शेजारचेही तिला अजून दिवस न गेल्याबद्दल बोचरेपणानं काही बोलत असत. तिच्या एचआयव्हीचं कळल्यावर 'आपल्याला आता आणखी बाळाची जबाबदारी नको' असं सुरवातीला हव्वालादेखील वाटलं होतं, पण त्याबद्दल तिला खूप वाईट वाटायचं. अनेक रात्री हमीदच्या कुशीत शिरून हव्वा रडायची. हमीद म्हणायचा, ''तेरेको बच्चा चाहिये ना, तो



ठीक है, तू रो मत, आता आपण कंडोम वापरणं बंद करू, म्हणजे झालं.'' हे मात्र हव्वाला कधीच मान्य व्हायचं नाही. ''डॉक्टरको पुछेबगैर कुछ मत करना,'' हातापाया पडून तिनं हमीदला विनवलं होतं. डॉक्टरांना विचारायची जबाबदारी तिचीच असणार, हेही एव्हाना हमीदचा स्वभाव कळल्यानं तिला माहीत झालेलं होतं.

डॉक्टरांसमोर हव्वानं विषय काढल्यावर ते प्रथम चिडलेच.

'' आत्ता हा काही विचार अजिबात करू नका. '' ते जवळ जवळ ओरडून म्हणाले. तिच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. मग तिला रडू आलेलं पाहून ते थोडे नरमाईनं म्हणाले. ''हमीदची तब्येत थोडी सुधारू द्या ना, बाळाची इतकी काय घाई आहे. हं?''

तिच्या डोळ्यातल्या पाण्याला डॉक्टरांच्या लेखी किंमत आहे, ते जरा नरमलेत, यापेक्षा आत्ता हा विचार नको, म्हणजे कधीच नको असं काही डॉक्टरांचं म्हणणं नाही, असा अंदाज हव्वानं काढला आणि त्याचंच तिला जरा बरं वाटलं.

हमीदला मात्र डॉक्टर हव्वाशी ओरडून बोलले, याचा फार राग आला होता.

''मै बता रहा था, तेरेको. उनको पुछनेकाही नही. ये निजी मामला है, हमारा. हम तय करेंगे ना. जैसेही तेरा पांव भारी हो जाय, हम उनको बता देंगे, क्या?'' हव्वा गप्प बसली, पण तिनं मनातून हे बिल्कूल मान्य केलं नाही.

हमीदची टीबीची औषधं आता संपत आली होती. यावेळी डॉक्टरांकडे गेल्यावर हव्वानं आता 'मूल हवं असल्याचा' विषय काढला. तिची छाती धडधडत होती, डॉक्टर पुन्हा तसेच रागावतील अशी तिला भीती वाटत होती. पण ते रागावले नाहीत, म्हणाले,'' बरं, पण सीडी४ कधी केलाय तुमचा?''

''नाहीच केला अजून. इनका टीबीकाही चल रहा था अबतक, मेरा कब सोचती मै?''

डॉक्टरांनी सांगितल्यानुसार हव्वाचा सीडी४ झाला. डॉक्टरांच्या समोर रिपोर्ट ठेवून ती त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव वाचायला समोर बसली.

सीडी४ सातशे आलेला बघून डॉक्टरांच्या चेहऱ्यावर चक्क हसू दिसलं,

तेव्हा हव्वालाही जरा धीर आला.

''डॉक्टरसाब, आता चालेल ना, पण मग कंडोमचं काय करायचं? कौन्सलर मॅडम बोली थी, हर वक्त लगानाही है, फिर बच्चा कैसे, मेरा मतलब...''

''हव्वा, पहिली गोष्ट, आता दर सहा महिन्याला सीडी४ करत राहायचं, हे आधी लक्षात ठेवा. जैसाकी हम हमीदके कर रहे हैं। इसका प्रेगनन्सीसे कोई ताल्लुक नही. प्रेगनन्सी हो, न हो, हर छे महिनेसे सीडी४ करना है, और मुझे रिपोर्ट दिखाना है, इसमे कोई गलती नही चलेगी. अब तुम्हारे प्रेगनन्सीके बारेमे कौन्सलर विस्तारसे तुम्हे बता देंगे, मी बोलतो त्यांच्याशी. कंडोम न वापरता संबंध काही ठरावीक दिवसच करायचे, एरवी मात्र कंडोम वापरायचाच. सीडी४ चांगले आहेत तसे तुमचे. तेव्हा काही काळजी करू नका.''

''पाँचासौ से उपर है तो अच्छे, हैं ना?'' दवाखान्यातच बसल्याबसल्या वाचायला मिळालेल्या पुस्तकातून कळलेली बाब तिनं अगदी हुशारीनं सांगितलेली बघून डॉक्टर हसत म्हणाले, ''हो. ''

''अगर वैसे नही होते तो?''

''तो पहले दवाई शुरू करनी पडती.''

''और फिर बच्चेका?''

''दवाई सुरू झाल्यावर.''

''अच्छा, म्हणजे दवाई सुरू केल्यावर दिवस राहू देता आले असते ना, आम्हाला? मला वाटलं, की एकदा दवाई सुरू झाली की.''

''ऐसी बात नही है, प्रेगनन्सी हो सकती है, त्याला काहीच अडचण नाही. आतासुद्धा, बाळाला एचआयव्ही लागू नाही म्हणून दिवस गेल्यावर चौथ्या महिन्यापासून तुम्हाला दवाई देणारच आहे मी.''

''वही पुछनेवाली थी मै अभी, बच्चेको, हमारी बिमारी नही लगनी चाहिये.'' हव्वाच्या डोळ्यांत एकदम पाणीच आलं.

डॉक्टरांच्या केबीनबाहेर येताच हव्वानं पतीचा हात कुणाला न कळेलसा क्षणभर धरला, आणि त्याच्याकडे बघून नाक उडवत ती थोडंसं हसली.

हमीदनं तिला हातानंच जवळ बोलावलं. आपलं बोलणं कुणाला कळू नये म्हणून तोंडासमोर हात धरत तो म्हणाला,'' सुन ना, बहोत प्यारी दिख रही हैं तू अभी. ''

डॉक्टरांनी सीडी४बद्दल, औषधांबद्दल सांगितलं, तर कौन्सलरबाईंचं वेगळंच. त्यांना मूल हवं असल्याचं कळल्यावर त्या म्हणाल्या, ''मूल होईल तुम्हाला, पण आपल्याला मूल का हवं आहे, याचाही विचार करा. शेजारी, नातेवाईक म्हणतात म्हणून हे मूल जन्माला घालायचं कारण पुरेसं नाही. आपल्याला संभाळायला जमणार आहे ना, खर्चाची काय व्यवस्था आहे, बाळाच्या अब्बूंची तब्येत बरी आहे ना? एच आय व्ही है, तो कभी ना कभी तुम्हेंभी खास दवाई तो लेनीही पडेगी. उसके लिए तुम हमारे जैसे किसी प्रायवेटमे आना चाहोगे, या गवर्न्मेंटमे जाओगे? हा सगळा विचार करून निर्णय घ्या. प्रेगनन्सीके लिए क्या करना है मैं अभी बता देती, अगर ध्यानमे नही रहा तो, पुढच्या माहवारीनंतर लगेचच पुन्हा एकदा माझ्याकडे या.''

कौन्सलरनं मग कपाटातून एक तक्ता काढला तो उघडून दाखवत शब्दाशब्दांवर जोर देत त्या समजावून देऊ लागल्या. ''मी मगाशी म्हणाले, तसा सगळा पुढचा मागचा विचार करा, मग तुमचा निर्णय झाल्यावर, म्हणजे 'आपल्याला बाळ हवंच आहे' असा जर तुमचा निर्णय झालेला असला, तर माहवारी संपल्यावर साधारण एका आठवड्यानंतर लगेच येणाऱ्या दोन–तीन दिवसांत कंडोम न वापरता संबंध करायचे. त्या दिवसात गर्भ राहण्याची शक्यता सर्वात जास्त असते. तरीसुद्धा एखाद्या महिन्यात लगेच दिवस राहतीलच असं नाही. पण हे दिवस सोडले, तर बाकी कुठल्याही दिवशी संबंध करायचे झाले, तर मात्र

पूर्वी सांगितल्याप्रमाणे कंडोम वापरायलाच हवा. त्यावेळी दिवस राहण्याची शक्यता तुलनेनं अगदी कमी असते, पण एकाच्या शरीरातील विषाणू दुसऱ्याच्या शरीरात जाऊन, आहे तो आजार जास्त वाढण्याची शक्यता मात्र असते, ती तरी टाळलेलीच बरी. समजतंय का मी काय म्हणतेय ते?''

''हां, समझी ना मै.'' हव्वा मोकळं हसून म्हणाली.

डॉक्टरांकडून परतताना हव्वा-हमीद अगदी खूश होते. एचआयव्ही झाल्यापासून, आता आपण जगणार की नाही, असे विचारही त्यांच्या मनात अनेकदा आलेले होते. पण आता 'आपल्याला एक नन्हासा प्यारासा बच्चा होईल, उसकेसाथ जिंदगी जिनेलायक बन जाएगी' या कल्पनेनंच त्यांना बरं वाटत होतं.



डॉक्टर मागच्यावेळी रागावले, त्याची बोच आता भरून निघाली होती.

'डॉक्टर तसे चांगले आहेत, आत्ताआत्ता हमीद जरा बरा झालाय, तेवढ्यातच पुढची जबाबदारी आपण अंगावर घेतो आहोत, याबद्दल त्यांना काळजी वाटत असणार, म्हणून मागच्यावेळी रागावले असणार ते.' हव्वाच्या मनात आलं.

कौन्सलरच्या बरोबर बाळाचा निर्णय असा नीट सोचविचार करून घेताना हव्वाला आपण किती विचारी आहोत असं वाटलं आणि त्याचा फार अभिमान वाटला. हमीद म्हणत होता, तसं परस्परच कंडोम वापरणं थांबवून गरोदरपण घेऊनच आलो नाही, हे किती चांगलं झालं, आपण किती जबाबदारीनं, सक्षमपणे वागतो आहोत, असंच वागायला पाहिजे.

घरी परतताना ती आणि हमीद बोलतच होते. रात्रीही खूप उशीरापर्यंत त्यांचं बोलणं संपलंच नाही. हव्वाला अनेक गोष्टी सुचत होत्या. आधी विचारच न केलेले अनेक प्रश्न दिसत होते, पण त्यांचा त्रास वाटत नव्हता; उलट अडचण आल्यावर उपाय शोधण्यापेक्षा आपण आधीपासून विचार करतो आहोत याचा आनंदच वाटत होता.

बाळाला एचआयव्ही लागू नये म्हणून डॉक्टर औषध देणार होते, पण तरी रुपयात २-३ पैसे अजूनही एचआयव्ही लागायची शक्यता होतीच. हमीदला आता औषधं सुरूच होती, ती जन्मभर घ्यायची होती. काही काळानं हव्वालाही सुरू झाली असती, तिलाही पुढे जन्मभर औषधं तर घ्यावी लागणार होतीच. मृत्यूची भीती नसली, तरी एचआयव्हीसह जगणं नेहमीपेक्षा थोडं वेगळंच असणार होतं, पण त्याला घाबरून आता चालणार नव्हतं.

''हव्वा, आजतक तुम्हे बताया नही था, आज बताता हूँ, मुझे एचआयव्ही है, समझके इतना बेबस नही हुवा था मै, जितना तुम्हारा रिपोर्ट देखकर हो गया था. खुद्कुशी करनेकाही सोच रहा था मै, पर तुम कितनी अच्छी हो, तुमने कभी हिम्मत नही हारी, और आज देखो तो, कहाँसे कहातक आ पहुँचे हम, हैं ना?''

हमीदच्या वाक्यानं हव्वाच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं. पण ते पुसून, काही न बोलता, तिनं त्याला घट्ट जवळ घेतलं.

**आई-बाबा व्हायचंय...**

**हा निर्णय तुमचा व तुमच्या जोडीदाराचाच आहे. तसाच असायलाही हवा!**

**पण काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत**

- आईचा आजार वाढलेला असेल, तिच्या शरीरात विषाणूंची संख्या जास्त असेल तर बाळाला लागण होण्याची शक्यता जास्त असते.
- काही संधिसाधू आजार आईला झालेले असतील तर त्यावर वेळीच (गर्भधारणेच्या आधीच) उपचार होणे हे होणाऱ्या बाळाच्या व आईच्या तब्येतीसाठी गरजेचे असते.
- काही लिंगसांसर्गिक आजार असतील तर गर्भ राहण्यास विलंब होतो किंवा नैसर्गिक गर्भपाताची शक्यताही वाढते. त्यामुळे त्यावरही वेळीच उपचार करणे गरजेचे असते.
- काही औषधे चालू असताना गर्भ राहिला तर त्यांचा बाळाच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आईला काही औषधे चालू असतील तर गर्भधारणा होण्याचा निर्णय घेण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- आईकडून बाळाला होणारी एचआयव्हीची लागण टाळण्यासाठीच्या संशोधनांना गेल्या काही काळात मोठेच यश मिळाले आहे. योग्य वेळी व परिणामकारक औषधे घेतली असता बाळाला लाग़णीची शक्यता २ टक्क्याहूनही कमी उरते. आईकडून बाळाला होणारी एचआयव्हीची लागण टाळण्यासाठीच्या पर्यायांची माहिती करून घेण्यासाठी तुमच्या डॉक्टर/ कौन्सलरशी जरुर बोला.

# सुलभा–सूर्यकांत



डॉक्टरांच्या खोलीतून  बाहेर पडल्यावर सुलभा जिन्याच्या पायरीवर बसून राहिली. अंगात थोडा ताप असल्याचं जाणवत होतं. कंबर दुखत होती. डॉक्टर खूप रागावले होते तिला.

तिला अणि तिच्या नवऱ्यालाही एचआयव्ही  आहे, त्यामुळे 'कंडोमशिवाय संबंध करायचेच नाहीत,' असं डॉक्टरांनी त्यांना निक्षून बजावलेलं आहे. एचआयव्ही तर आहेच, पण  संबंधांच्याच मार्गानं पसरणारे आणखी काही आजार आता पुन्हा एकमेकांना लागू नयेत, म्हणून 'प्रत्येक शरीरसंबंधांच्या वेळेला कंडोम वापरायलाच हवा 'असं डॉक्टर म्हणतच असतात.

सुलभाच्या एकटीच्या हातात असतं तर तिनं हे अगदी मुकाट्यानं ऐकलं असतं. पण तिचा नवरा दारू पिऊन येतो, संबंध करतो. नेमके दिवसही जातात, मग औषधं घ्यावी लागतात. कधीकधी औषधांचा उपयोग होत नाही मग पिशवी धुवायचं ऑपरेशनच करावं लागतं. ही

आता नेहमीचीच गोष्ट झाली होती. गेल्या दोन वर्षात चारदा तरी ही वेळ सुलभावर आलेली होती.

डॉक्टरच्या समोर उभं राहायचीसुद्धा सुलभाला लाज वाटते, म्हणून प्रत्येक वेळी ती डॉक्टर बदलते. यावेळी तर ती एका शेजारणीला घेऊन आडरस्त्याच्या एका गर्भपात केंद्रात गेली होती. तिथे भूलही नव्हती दिली. नुसतं बधिर करून त्यांनी पोट खाली करून दिलं.




'किती दुखलं आपल्याला. आणि तेव्हापासून अंगावरून जायचं थांबलेलंच नाही. शिवाय आता तापही यायला लागलाय. पण आपण तरी काय करणार, दारू पिऊन आलेला नवरा ऐकत नाही. आपल्याला त्याला थांबवताच येत नाही.'

तापासाठी डॉक्टरांनी औषधं लिहून दिली होती, पण ती आणायची तर पैसे लागले असते. कामावर खाडे झाल्यावर पुन्हा 'आगाऊ पैसे द्या' म्हणायचं तिला संकटच वाटे. तसे बँकेतून पैसे काढता येतील म्हणा; अजून चारपाच हजार रुपये खात्यात असणार. घरात पैसे ठेवले की त्यावर आपला अधिकारच राहत नाही. नवरा कधीही मागतो, आणि दारूत उडवतो. म्हणून कामावरच्या एका मालकिणीच्या मदतीनं तिनं जवळच्या एका बँकेत खातं काढलं होतं. त्यात चांगले वीस हजार रुपये साठलेही होते, पण त्यातलेही बरेच पैसे गेल्या पंधरा दिवसातल्या घटनांनी काढावे लागले होते. पण आता दुसरा काही इलाजच नव्हता.

औषधं घेऊन ती घरी पोचली, तेव्हा मुलं शाळेत गेलेली होती. त्यांच्यासाठी सकाळी कशाबशा चपात्या करून ठेवल्या होत्या. मुलं घरी येईपर्यंत आपल्याला थोडं तरी बरं वाटायलाच हवं. औषध घेऊन गोधडी हांतरून ती झोपली; पण मिटलेल्या डोळ्यांपुढे अनेक विचार यायला लागले. 'वाढीच्या वयातली मुलं आहेत आपली, त्यांना रोज ताजं पोटभर खायलाप्यायला तर आपण द्यायला हवं. चार घरच्या कामातून तेवढे पैसे आपल्याला मिळतातही, पण हे महागडं कुंकू वाट्याला आलंय, त्यानं केलेली खरकटी निस्तरता निस्तरता नको झालंय अगदी. त्यांचं बरंय, त्याला ना कशाची काळजी, ना कशाची खंत. प्यायचं न पडायचं.

यावेळी तर दिवस राहिल्याचंही तिनं त्याला सांगितलं नाही. पण आता डॉक्टरांना तसं सांगितल्यावर ते त्याबद्दलही रागावले. म्हणाले,

''तुम्ही एकटीनं सगळं भोगत राहणं बरोबरच नाही. तुम्ही त्यांना सांगा, आणि उद्या त्यांना घेऊनच या.''

दुसऱ्या दिवशी नवऱ्याला – सूर्यकांतला बाबापुता करून तिनं डॉक्टरांकडे नेलं होतं खरं, पण डॉक्टर काय सांगत आहेत, याकडे त्याचं लक्ष असेल याची मात्र तिला खात्री नव्हती. 'आपणच सगळं करतो, पैसे मिळवतो, मुलांना वाढवतो, आपापला गर्भपातही जाऊन करून येतो; तेव्हा, पुन्हा ही असली वेळ आपल्यावर येऊ नये यासाठी काय करायला हवं, हेही आपल्यालाच समजावून घ्यायला हवं. त्याला नुसतं बरोबर न्यायचं, म्हणजे डॉक्टरांकडून जास्त माहिती विचारून घेता येती, चार प्रश्न विचारता येतात. शिवाय नवऱ्याच्या तुलनेत आपण बाई असून हुशार असल्याचं डॉक्टरांना दिसेल, त्याचाही फायदा आपल्याला होईल. डॉक्टरांना आपल्याबद्दल सहानुभूती वाटेल, ते फीमध्ये काहीतरी सवलत देतील, स्वत:जवळची सॅम्पलची औषधं देतील. हे सगळं जमवायचं तर आपणच तयारीनं वागायला हवं.'

विचार करून करून डोकं अजूनही भणभणत होतं. पण तिनं स्वत:ला बजावलं. ग्लास भरून पाणी प्यायली, मोरीत जाऊन आली, आणि मन लावून डॉक्टरांच्या समोर येऊन बसली. सूर्यकांतही होताच शेजारी, पण तो ऐकत तरी होता की नाही, कुणास ठाऊक.

डॉक्टरांनी बोलायला सुरवात केली. ''तुम्हाला लक्षात ठेवायला हवं की तुम्हाला एचआयव्ही आहे. नियमितपणे सीडी४च्या तपासण्या करायला हव्यात, औषधं अगदी नियमित घ्यायला हवीत, आणि प्रत्येक संबंधांच्या वेळी कंडोम वापरायलाच हवा.'' तिला थोडं हसूच आलं, तिला कुणी त्यांच्या खुर्चीत बसवलं असतं तरी तिनं एवढं सांगितलं असतं, इतकं तिला आता हे पाठ झालेलं होतं. प्रत्येकवेळी ते हे सांगायचेच.

''कधीकधी वापरतो आम्ही कंडोम, नाही काहो? '' ती मुद्दामच एखाद्या बावळट बाईसारखी म्हणाली. 'कधीकधी वापरून काहीच उपयोग नाही' असं डॉक्टर म्हणणार, हे न समजण्याइतकी बावळट ती कधीच नव्हती. डॉक्टरांसमोर आपला नवरा भिजल्या मांजरागत गप बसून राहील, तेव्हा त्याला समजावं, म्हणून असा एखादा धक्का अधूनमधून द्यायलाच हवा. प्रश्नाचं उत्तर माहीत असूनसुद्धा तिनं पुन्हा डॉक्टरांना विचारलं,

''आम्हाला दोघांना हा आजार असतानासुद्धा आम्ही नियमित कंडोम का वापरायचा? काय फरक पडतो, नाही वापरला तर? यांना पण हा प्रश्न पडतो.''

डॉक्टरांनी क्षणभरच संतापून तिच्याकडे बघितलं.

'अनेकदा सांगूनही या लोकांना काही कळत कसं नाही,' असा प्रश्न त्यांच्या डोळ्यात तिला स्पष्ट दिसला. पण मग, 'ही बाई हे सगळं कसं सोसत असेल' असा विचार मनात येऊन ते आपणच शांत होऊन म्हणाले, ''परत एकदा सांगतो, दोघांनी नीट लक्ष देऊन समजावून घ्या.'' सांगतासांगता त्यांनी वर दोघांच्या चेहऱ्याकडे बघितलं

आणि ते जरा दचकले. सूर्यकांतचा चेहरा ठार कोरा होता, तर सुलभाबाईंच्या चेहऱ्यावर पुसटसं हसू होतं. त्यांनी आता तिलाच उद्देशून बोलायला सुरवात केली. ''हा विषाणू स्वत:चं रूप बदलत राहतो, अशा बदललेल्या विषाणूची एकमेकांना लागण व्हायला नको, म्हणून तुम्ही कंडोम वापरायलाच हवा. आणि तुमच्याबाबतीत तर आणखी एक प्रश्न वारंवार येतो आहे. किती वेळा गर्भपात करून घेतला आहे तुम्ही गेल्या दोन वर्षात, सांगा बरं, '' तिनं उत्तर न देता मान खाली घातली. ''त्यासाठीही तुम्हाला काळजी घ्यायलाच पाहिजे. कंडोम तर वापरायला हवाच पण त्याशिवाय मूल न होण्यासाठी आणखी काहीतरी काळजी घ्यायलाच हवी. चारचारदा असे गर्भपात होत असले तर तुमची प्रकृती कशी नीट राहणार? काय?'' .

सूर्यकांतच्या चेहऱ्यावर फारसा फरक पडला नाही, तरी त्यावरची बिनडोक लाचारी आणखी थोडी गडद झाली. सुलभाबाई काहीच बोलली नाही. डॉक्टरच पुढे बोलू लागले,'' तुम्हाला  दोन मुलंही आहेत, आता खरं म्हणजे तुम्ही ऑपरेशनच का करून घेत नाही? ''

हेही बोलणं अनेकदा झालेलं होतं.

'हे डॉक्टर आता पुरूषांचं ऑपरेशन सोपं असतं हे सांगत बसणार' सुलभाच्या मनात आलं. 'ते करून घ्यायचा आग्रह धरणार, आणि आपला  नवरा तिथं भिजलं मांजर, आपल्याकडे मदतीच्या आशेनं बघत गपगार बसणार, घरी आला की वाघ! शेवटी काय, बाईचं का बाप्याचं होईना पण ऑपरेशन होणं लांबणीवरच पडत चाललंय आणि मधल्या काळात आपले गर्भपात तेवढे होताहेत'.

''ऑपरेशन करून घ्यायाला हवंच आहे, डाक्टर, एका वक्ताला ते जरा लांब राहिलं तरी मला चालेल, पन हे पुना पुना व्हायला नकोय्, त्याला काय करू ते सांगा.'' ती सुरवातीपासूनचा बावळट सूर कायम ठेवत म्हणाली. आता बहुधा डॉक्टरांना तिच्या वागण्याचा अर्थ कळला असावा, कारण त्यांनी क्षणभर डोळे मिटले, आणि मान हलवली. सुलभाचीही मान नकळत हलली. तिनं नवऱ्याकडे बघितलं, आणि त्याच्या संपूर्ण असमंजस चेहऱ्याकडे पाहून तिला मनातच हसू फुटलं. ते चेहऱ्यावर न दिसू देता ती अपेक्षेनं डॉक्टरांकडे बघू लागली.

''बरोबर आहे तुमचं,'' असं म्हणत डॉक्टरांनी मग गर्भनिरोधनाच्या साधनांचा सगळा तक्ताच त्यांच्यासमोर, म्हणजे खरं तर तिच्यासमोरच, मांडला. अगदी मनापासून त्यांच्याकडे ध्यान देत तो समजावून घेताना तिला आपल्या परिस्थितीबद्दल एकीकडे खिन्न वाटत होतं, तर दुसरीकडे हसूही येत होतं.



**मूल हवे आहे का?**

- नक्की नको आहे
  - मूल न होण्याचे ऑपरेशन करायचा पर्याय आहे
- निर्णय होत नाही/ सध्या नको
  - निरोधसह इतर काही कुटुंबनियोजनाची साधने वापरायला हवीत?
    - होय
      - गर्भनिरोधक गोळ्या
      - इंजेक्शन
      - तांबी
    - नाही
      - निरोध प्रत्येकवेळी योग्य पध्दतीने वापरला तरी गर्भधारणेची थोडी शक्यता राहते. अशी चिंता वाटली तर तत्काळ वापरता येणाऱ्या गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर करता येईल.
- होय, हवे आहे
  - मूल हवे आहे हे डॉक्टरांशी बोला व बाळाला लागण टाळण्यासाठीच्या पर्यायांची माहिती करून घ्या.
    - जोडीदाराला लागण आहे किंवा नाही यावरून कृत्रिम गर्भधारणा करायला हवी आहे का, हे ठरवता येईल.

## गर्भपाताच्या गोळ्या

- गरोदरपणाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजेच पाळी चुकल्यापासून ९ आठवड्यांपर्यंत या पद्धतीने गर्भपात करता येतो. यासाठी गोळ्यांचे २ डोस घ्यायचे असतात.
- पहिला डोस घेतल्यानंतर फारसा त्रास होत नाही.
- पण दुसरा डोस घेतल्यानंतर रक्तस्राव व्हायला लागतो. बऱ्याचदा त्यामध्ये गाठीही असतात. साधारण २ तास हा रक्तस्राव होतो. नंतर १ ते ३ आठवड्यांपर्यंत थोड्या प्रमाणात रक्तस्राव होत राहतो. म्हणून दुसरा डोस घेताना प्रवासात किंवा दगदगीच्या वातावरणात घेऊ नये. घरी शांतपणे राहत असतानाच घ्यावा.
- गोळी घेतल्यावर अधूनमधून पोटात कळ येऊन दुखू शकते. अशावेळी वेदनाशामक औषध घ्यायला हरकत नाही.
- शंभरात १ ते २ स्त्रियांमध्ये या गोळ्यांनी गर्भपात पूर्ण न होण्याची शक्यता राहते. असे झाल्यास पिशवी धुऊन घेण्याची शस्त्रक्रिया करून घ्यावी लागते.

## असुरक्षित गर्भपात

- आवश्यक ते कौशल्य नसणाऱ्या व्यक्तीने किंवा आवश्यक ती सुविधा नसलेल्या जागी गर्भपात करून घेतला तर तो धोकादायक ठरू शकतो.
- अशा ठिकाणी त्यातील धोक्यांबद्दल बहुधा चर्चाच होत नाही.
- स्वच्छतेची पुरेशी काळजी घेतली जात नाही. काही वेळेस योनिमार्गामध्ये एखादी वस्तू / पारंपरिक औषधे घालून गर्भपात करण्याचा प्रयत्न केला जातो किंवा जोराने पोटावर मसाज केला जातो. अशा पद्धतीने केलेला गर्भपात हा धोकादायक ठरू शकतो.
- गर्भपाताच्या गोळ्या चुकीच्या पद्धतीने देणे किंवा औषधविक्रेत्याकडून परस्पर अशा गोळ्या घेऊन गर्भपाताचा प्रयत्न करणे धोकादायक ठरू शकते.

## असुरक्षित गर्भपाताचे आरोग्यावर होणारे परिणाम

जगभरात स्त्रियांच्या गर्भारपणाशी निगडीत मृत्यूंपैकी १३% मृत्यू हे असुरक्षित गर्भपातांमुळे होतात.

**असुरक्षित गर्भपातांचे परिणाम**

- अर्धवट गर्भपात
- गर्भपातानंतर इतर जंतूंचा संसर्ग
- अति रक्तस्राव
- जननेंद्रियांना इजा
- मृत्यू

**अशा परिणामांची तीव्रता ठरते ती...**

- गर्भपात जेथे केला आहे त्या ठिकाणच्या सोयी – सुविधांवर
- गर्भपात करणाऱ्या आरोग्यसेवकाच्या कौशल्यावर
- गर्भपातासाठी वापरण्यात आलेल्या पध्दतीवर
- स्त्रीच्या तब्येतीवर
- गर्भपात कोणत्या आठवड्यात झाला आहे, यावर

फक्त एच.आय.व्ही.ची लागण आहे म्हणूनच नाही, तर गर्भपात करून घेण्याचीही बऱ्याचदा स्त्रियांना लाज वाटते व त्यामुळे त्या वेळीच प्रशिक्षित डॉक्टरांकडे जाण्याचे टाळतात. त्यामुळेही असुरक्षित गर्भपाताचा आरोग्यावर होणारा अतिशय विपरीत परिणाम ओढवून घेतला जातो.

## गर्भनिरोधक गोळ्या

- गोळ्यांमध्ये असलेल्या विशिष्ट रसायनांमुळे बीजांडातून स्त्रीबीज बाहेर येणे लांबते व गर्भधारणा टळते. गोळ्या नियमित घ्याव्या लागतात.
- नियमितपणे गोळ्या घेतल्यास १०० स्त्रियांपैकी ९२ ते ९९ स्त्रियांना गर्भधारणा टाळता येते.
- रीटोनाव्हीर नावाचे ए.आर.टी. चे औषध चालू असेल तर या गोळ्या घेता येत नाहीत.
- बाळाला अंगावर पाजत असेपर्यंत या गोळ्या घेता येत नाहीत. हृदयाचा किंवा यकृताचा काही आजार असला तरीही या गोळ्या घेऊ नयेत.
- काही स्त्रियांना या गोळ्यांमुळे अनियमित रक्तस्राव, डोकेदुखी, वजनात बदल असे त्रास होऊ शकतात. यासाठी गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्याने सुरू कराव्यात.
- गोळ्या घेत असाल तरी निरोधचा वापर नियमितपणे करायचाच आहे.

## गर्भनिरोधक इंजेक्शन

- या इंजेक्शनने स्त्रीबीज बीजांडातून बाहेर येत नाही व गर्भधारणा टळते.
- हे इंजेक्शन दर दोन किंव तीन महिन्यांनी दंडात किंवा कमरेत (एरवीचे एखादे इंजेक्शन घेतात तसेच) घ्यावे लागते.
- नियमितपणे घेतल्यास १०० पैकी ९७ स्त्रियांना गर्भधारणा टाळता येते.
- इंजेक्शनमुळे मासिकपाळीच्या चक्रात आणि रक्तस्रावाच्या प्रमाणात बदल होतात. सुरवातीला काही महिने अनियमित पाळी व नंतर मासिकपाळी (तात्पुरती) बंदही होऊ शकते. ज्या स्त्रियांच्या रक्तातील लोहतत्त्व म्हणजे लालसरपणा कमी झाला आहे, त्यांना पाळी न येण्याने रक्तस्राव न झाल्याचा फायदाच वाटू शकेल.
- पण एक लक्षात ठेवलं पाहिजे, जेंव्हा बाळ हवे असेल तेंव्हा इंजेक्शन बंद केल्यावर स्त्रीबीज आधीप्रमाणे तयार व्हायला व गरोदर राहायला तुलनेने जास्त काळ लागतो.
- इंजेक्शन घेत असाल तरी निरोधचा वापर नियमितपणे करायचाच आहे.

## तांबी (कॉपर-टी)

- दीर्घकाळ गरोदरपण नको असल्यास गर्भाशयात तांबी बसवता येते.
- तांबी इंग्रजी T या अक्षरासारखे दिसणारे लवचीक प्लास्टिकचे साधन आहे. त्यावर असणाऱ्या तांब्याच्या आवरणामुळे शुक्राणू व स्त्रीबीज यांचे फलन होत नाही व गर्भधारणा टळते.
- तांबी बसवलेल्या १०० स्त्रियांपैकी ९९ मध्ये गर्भधारणा होत नाही.
- बाळंतपणानंतर ४ आठवड्यांनी तांबी बसवता येते. ज्या स्त्रियांचा एचआयव्हीचा आजार खूप वाढलेला आहे व ए.आर.टी.ची औषधेही चालू नाहीत अश्या स्त्रियांनी तांबी बसवू नये. आजारासाठी ए.आर.टी.ची औषधे सुरू करावीत व प्रतिकारशक्ती वाढल्यावरच तांबीचा विचार करावा.
- तांबी बसवलेली असेल, तरीही निरोधचा वापर नियमितपणे करायचाच आहे.

# संध्या-संभाजी

संभाजीनं 'आपण आज फिरायला जाऊया' असं मोबाईलवर म्हटलं, तेव्हाच त्याला काय सुचवायचं आहे, हे संध्याच्या लक्षात आलं होतंच, पण संभाजीला नाराज कसं करणार?

काही करून, आता आपलं लग्न ठरावं आणि भावावहिनीच्या घरातून बाहेर पडता यावं, असं तिला आजकाल फार वाटत होतं.

आईच्या मृत्यूनंतर तिचं असं कुणीच या जगात राहिलेलं नव्हतं. भाऊ-भावजय होते पण त्यांना तिची काडीचीही किंमत नाही, हे तिला एव्हाना कळून चुकलं होतं.

ती नोकरी करत होती, निम्मा-पाऊण पगार भावजयीच्या हातात देत होती, म्हणून ते तिला घरात राहू तरी देत होते. या सगळ्यांत एकच आशेचा किरण होता, संभाजी.

तिच्या नोकरीच्या ठिकाणी, इलेक्ट्रीकचं फिटिंग करायला आला आणि तिच्याकडे बघून हसला. जाताना त्यानं तिचा मोबाईल नंबर मिळेल का, असं विचारलं. तिनंही हसून तो दिला आणि दुसऱ्याच दिवशी त्याचा पहिल्यांदा फोन आला. तेव्हापासून आता गेले चार-पाच महिने घरात कितीही त्रास असला, तरी संध्याला त्याचं काही वाटत नाही. दिवसात चार वेळा संभाजीचा फोन येतो, दिवसाआड तरी ते दोघं भेटतातच. संभाजी तिला बागेत घेऊन जातो, कधी नदीकाठी घेऊन जातो, थोडा अंधार झाल्यावर तिला जवळ धरतो. तिला हे त्याचं वागणंही आवडतं. त्यानं जवळ धरावं, आपण त्याच्या हातावर हात ठेवावा, त्यानं आपल्याला ड्रेस घेऊन द्यावा, ह्या सगळ्याची तिलाही आस आहेच. पण तेवढ्यावर तो थांबत नव्हता, दोनतीनदा एखाद्या मित्राच्या खोलीवर तो तिला घेऊनही गेला होता. तिथे त्यानं पुढची मागणी केली होती. ''लग्नानंतर...'' ती पुटपुटली होती.

'' लग्न करणारच, आहे मी राणी तुझ्याशी. पण मला आत्ता तू हवीस.'' तो हट्टीपणानं म्हणाला.

संध्यानं त्याच्या हट्टापुढे मान तुकवली.

तो तिच्याशी किती चांगला वागायचा, तिचे लाड करायचा. त्याच्या इच्छेला मान द्यायचा नाही तर काय? शिवाय तिलाही त्याचा मोह पडतोच आहे की. तिनं स्वत:लाच समजावलं.

'संभाजी आपल्याला फसवणार तर नाही ना?' अशी शंका कधीतरी तिच्या मनात येई. पण तो माणूस अगदी फसवणाऱ्यातला दिसत नाही, असं तिचं मत होतं.

फक्त कधीकधी एकदम चिडतो. उगाचच, काही कारण नसताना एकदम इतका संतापतो, की बस. आणि मग काय, त्याच्या मनासारखं करून घेतो.

तो असा चिडतो तेव्हा त्या रागामागं काहीतरी लपवतो आहे असं तिला वाटतं. पण ते तेवढंच. 'असतो एकेकाचा स्वभाव रागीट. आपलं माणूस म्हटलं, मनं जुळली की आपणही समजावून घ्यायला हवं ना.' ती स्वत:चीच समजूत घाले.

'' आज एकदा तेवढंच हं, आता एकदम लग्नानंतरच. ''

प्रत्येक वेळी ती म्हणे.

हवं ते मिळालं, की हसणाऱ्या लहान मुलागत तो हसे; तिला जवळ ओढत न चुकता 'हो' म्हणे.

असंही आजवर सातआठदा तरी झालंय, पण एक गोष्ट होती. तो अगदी न विसरता निरोध मात्र वापरतो, त्यामुळे दिवस राहाण्याची काळजी तिला फारशी नसे. तरी

प्रत्येकवेळी उगाच पोटात गोळा यायचा, 'काय सांगावं, हा निरोध फाटलाबिटला तर? आणि मग दिवस राहिले तर भाऊवहिनी काय करतील त्याचा विचारच करायला नको. हल्ली दिवस राहू नाही, म्हणून गोळ्या मिळतात ; अशा संबंधांनंतर घ्यायच्या. त्या तरी आपण आणून ठेवाव्या, पण त्या कुठल्या गोळ्या ते आपल्याला कसं कळणार? त्यांची नीट माहिती करून घ्यायला हवी. ऑफीसमधल्या मैत्रिणीला विचारावी का हल्ली जिथे सगळं कळतं, त्या नेटवरून शोधून द्यायला?' तिच्या मनात विचारांचं चक्र सुरू असे.

आज तर संभाजीनं अगदी कमालच केली, त्यानं एका लॉजमध्ये खोली घेऊन ठेवली होती. तसा काही त्रास झाला नाही, तरी ते लॉज तिला अजिबात आवडलं नाही. काहीतरी घाणेरडी गोष्ट करत असल्यासारखं वाटत होतं. त्याच्याबरोबर जिन्याने तिथे खोलीत जाताना आजूबाजूची लोकं आपल्याकडे विचित्र नजरेनं पाहात असल्यासारखं वाटत होतं. मान खाली घातली तरी पाठीला त्यांच्या नजरा बोचत होत्या. कसल्यातरी ओंगळ गुलाबी रंगाच्या भिंती बकाल दिसत होत्या.

' इथे आपण पुन्हा कधीच यायला नको' असं संभाजीला ती सांगणार होती; पण त्याचाही चेहरा आज काहीसा घाबरलेला दिसत होता. ''तुझं नक्की माझ्यावर प्रेम आहे ना, कुठल्याही संकटात आपण एकमेकांची साथ द्यायची ना?'' असा प्रश्न त्यानं इतक्या वेळा विचारला की तिला



त्याची काळजीच वाटायला लागली. विशेष म्हणजे आज त्यानं निरोधही आणलेला नव्हता. विचारलं तर म्हणाला, ''खूप काम होतं आज दिवसभर. आपल्या लग्नासाठी पैसे जमवतोय मी, म्हणून दुप्पट काम करतोय.''

लग्नासाठी पैसे गोळा करण्याबद्दल तिला साहजिकच आनंद झाला, पण निरोध न आणण्याचं ते कारण कसं काय होईल? तिनं पुन्हा विचारलं. तेव्हा तो एकदम तिच्यावर डाफरत म्हणाला, '' वेळ नाही मिळाला मला, निरोधबिरोध आणायला.''

तिथून निघाल्यावर संध्याला काहीतरी चुकल्यासारखंच वाटायला लागलं

''मला आता घरी जायचंय''

ती म्हणाली, संभाजीनं मान डोलावली. त्यानं तिला नेहमीसारखं घराच्या कोपऱ्यावर सोडायचं, असंही ठरलं. पण संभाजीची मोटरसायकल घराच्या रस्त्यानं जाईना. तिनं दोनदा विचारलं तरी उत्तरच न देता, तिला घेऊन तो वेगळ्याच रस्त्यानं निघाला आणि एका मोठ्या दवाखान्याशी आला. तिला काही कळेना. तो तर आपणहून काहीच बोलायला मागत नव्हता. शेवटी तिनंच 'इकडं कुठं?' असं विचारल्यावर संभाजी म्हणाला, ''आपले कस्टमर आहेत, त्यांचा फोन आला होता, काहीतरी काम असेल. काय आहे बघतो, आणि लगेच निघू.''

'मग हे आधीच का नाही सांगितलं?' असा प्रश्न मनात येऊनही त्याच्या चर्येकडे बघून तो विचारण्याची हिम्मत तिला झाली नाही.

तिथे पोचल्यावर पेशंटसारखं बाहेर खुर्चीवर बसून राह्यला लागलं.

''काय काम आहे, ते बघा ना, आपण निघू लगेच. आपण काय पेशंट आहोत का?'' ती म्हणाली. संभाजीनं नीट उत्तर दिलं नाही.

''गप बस, डॉक्टर पेशंट तपासतायत, त्यांच्याकडे केवढी गर्दी आहे, दिसत नाही का तुला?'' तो काहीसा ओरडून म्हणाला, आणि अस्वस्थपणं तिथल्याच वर्तमानपत्रानं वारा घेत गप्प बसला.

काही वेळानं तो एकटाच उठला. आत कुणाशी तरी बोलून बाहेर आला. तो आला की निघायचं, अशा तयारीनं ती पर्स उचलून उभी राहिली. बाहेर येऊन संभाजीनं तिथल्याच दुसऱ्या खोलीकडे बोट केलं आणि तो म्हणाला, '' चल, भेटून घेऊ.''

''डॉक्टरांना? ''

''नाही, डॉक्टर नाहीत ते, समुपदेशक म्हणतात त्यांना. ''

'' आपण कशाला त्यांना भेटायचं?''

त्यानं काहीच उत्तर दिलं नाही.

हे काय चाललंय, ते संध्याला समजेना. उशीर व्हायला लागला होता. घरी वेळेवर न पोचलं, तर भाऊवहिनी कसे टोचून हैराण करतील, हे आताच दिसायला लागलं होतं.

'' मी जाऊ का आता संभाजी? रिक्षा करून जाईन मी. तुम्ही करून घ्या तुमचं काम. दादा–वहिनी... ''तिनं एक पाऊल दाराच्या दिशेनं टाकलंही.

'' अरे, नाही नाही, माझ्या ... म्हणजे ... तुलाच त्यांनी बोलावलंय.'' तो अडखळत म्हणाला.

''मला? संभाजी, हे काय चाललंय, मला जरा स्पष्ट सांगशील का?'' संभाजीनं उत्तर दिलं नाही. फक्त तिच्या खांद्यावर हात ठेवला, तो प्रेमानं, की तिनं जाऊ नाही म्हणून धरुन ठेवायला ह्याबद्दल तिला शंका यायला लागली.

संभाजीचा हात हिसडून पळत सुटावं का, असाही विचार मनात आला. पण तिनं स्वत:ला सावरलं.

त्यांचा नंबर आल्याची संभाजीला कुणीतरी खूण केली. त्या खोलीत समुपदेशक बसलेले होते.


समुपदेशक म्हणजे म्हणजे परिस्थिती काय आहे, काय नाही, त्यात काय काय करता येईल ते समजावून सांगणारे. म्हणजे त्यांनीच तिला स्वत:ची अशी ओळख करून दिली.

'परिस्थिती नीट कळली ना, की निर्णय घ्यायला सोपं जातं.' ते म्हणाले. तिला ते पटलं; पण हे आपल्याला का सांगितलं जात आहे, ते तिला कळेना.

'तुमचं संभाजीवर प्रेम आहे का?' समुपदेशकांनी संध्याला विचारलं.

संध्या 'हो' म्हणाली, पण 'हे तुम्ही मला का विचारता आहात, तुमचा काय संबंध?' असा प्रश्न तिच्या मनात उभा राहिला.

मग ते पुढे बोलायला लागले, काही वेळानं तिच्या मनासमोर चित्र स्पष्ट दिसायला लागलं. या चित्राची अपेक्षा तर तिनं कधीच केलेली नव्हती. तिला आपल्या डोक्यावर आभाळ कोसळल्याचाच भास झाला.



समुपदेशकांच्या म्हणण्यानुसार संभाजीला एचआयव्ही रोगाची लागण होती. आजार बरा होणारा नसला, तरी काळजी घेतली, नीट औषधं घेतली तर तो चांगला जगू शकेल, फारसा काही त्रास होणार नाही. तेव्हा तशी काहीच चिंता नाही.

ती पुढे ऐकत गेली. ''हा आजार लैंगिक संबंधातून पसरतो. त्यामुळे त्या व्यक्तीच्या लैंगिक जोडीदारालाही तो होण्याची शक्यता असते.'' (संध्याच्या पोटात खड्डा पडला.) समुपदेशक सौम्य आवाजात प्रेमळपणे समजावून सांगत होते.

''एचआयव्ही असलेल्या व्यक्तीशी लग्न करण्यात बाकी अडचण तशी काही नाही, पण संबंधांच्या वेळी कंडोम वापरायला मात्र हवाच. नाहीतर...'' .

समुपदेशक नावाच्या त्या परक्या माणसासमोर आपलं मन उघडं करून दाखवायची तिच्या मनाची अजून तयारी होत नव्हती. पण तिच्या मनात एव्हाना संभाजीबद्दल संताप धुमसू लागला होता.

संभाजीनं आपल्याला आजवर कधीच हे एच आयव्हीचं सांगितलेलं नाही; ना आज इथे आणताना कुणाकडे कशासाठी जायचं आहे हेही सांगितलं; ही गोष्ट आपण निदान या समुपदेशक का कोण आहेत त्यांना तरी सांगायलाच हवी.'

'' इतके दिवस माझ्याशी प्रेमाच्या आणाभाका घेताना त्यांनी मला हे एचआयव्हीचं सांगितलेलंच नाही. याचा अर्थ माझ्या दृष्टीनं असा होतो की त्यांनी मला फसवलेलंच आहे.'' आपला आवाज फाटू नाही असा निष्फळ प्रयत्न आटोकाट करत ती म्हणाली. ''पण मी कंडोम वापरलाय, ते तुझी काळजी मला होती, म्हणूनच ना. फसवलं कसं काय म्हणतेस आता तू?''

तो तिच्या अंगावर रागानं डाफरला. ''माझ्या अंगावर ओरडू नका तुम्ही संभाजी, नेहमी वापरता ते माझ्या काळजीनं; तर मग, आज?'' तिला पुढे बोलवेना. तरी ती

धीर करून म्हणालीच. ''मुळात मुद्दा असा आहे की तुम्हाला एच आयव्ही आहे, हे मला आजवर सांगितलंच का नाही?''

''तुला काय त्यातलं कळतं, म्हणून सांगायचं? इथे सगळं सांगतील म्हणूनच आज आणलंय ना इथं, तू येत नव्हतीस, कशाला कशाला करत होतीस, तरी ओढून आणलं ना?''

त्याचा सूर स्वत:ची चूक मान्य करायचा तर नव्हताच, उलट स्वत:चीच बाजू तो लढवत होता; तेही वरचा आवाज काढून, तिला बोलू न देता. तिला आता रडू यायला लागलं. त्यावर तो म्हणाला, ''तू रडू नको, मी तुला तुझ्या भाऊभावजयीच्या छळातून मुक्त करणार आहे, तुला नवीन आयुष्य देणार आहे.'' काय बोलावं तेच न समजून ती गप्प झाली.

'समुपदेशक नावाच्या त्या परक्या माणसासमोर काय म्हणणार? आपलंच नाणं खोटं!'

तिच्या चेहऱ्यावरची निराशा कमी करायला असेल, पण विषय थोडा बदलत समुपदेशक म्हणाले, ''आपल्याला एकदा तुमचीही तपासणी करून पाहायला हवी.''

''कधी करायची?''

''निरोध न वापरता संबंध झालेले असले, तर तशा लैंगिक संबंधांनंतर तीन महिन्यांनी करायला हवी. असं झालंय का कधी?''

''हो, आज!''

''आज? अनेकदा असे संबंध येतात का?''

समुपदेशकाच्या आवाजातही कंप जाणवला तिला.

''हो, संबंध येतात, पण निरोध न वापरता एकदाच, आज!''

तिनं भीडभाड न बाळगता सरळ उत्तर दिलं

आणि तिच्या उत्तराबरोबरच त्यांच्या म्हणण्याचा अर्थ, तिलाच सगळं कळून चुकलं.

समुपदेशक पुढे काहीतरी बोलले, ते तिला ऐकूही आलं नाही. काहीवेळ ती सुन्न बसून होती.

मग, सगळी ताकद एकवटून तिनं बोलायला सुरवात केली.

''हे बघा, आज निरोध न वापरता आमचा संबंध झालेला आहे, याचा अर्थ मलाही एचआयव्ही झालेला असणार.''

''हो, शक्यता आहे, पण ती फक्त १ ते २ टक्केच.''

''इतकी कमी शक्यता कशी? हा आजार यातूनच पसरतो ना, तुम्हीच मगाशी म्हणालात.''

''हो, पण प्रत्येक संबंधातून लागण होतेच असं नसतं. एका संबंधातून लागण होण्याची शक्यता १%च असते.''

''तेच म्हणतो मी, घाबरू नको तू, तुला काही होऊ दिल का मी? राणी, मला काळजी आहे तुझी.'' संभाजी मध्येच बोलला.

''संभाजी तू गप्प बैस, एक शब्दही बोलू नकोस तू.''ती तीव्रपणे म्हणाली.

एरवी ती त्याला अगदी क्वचितच प्रेमाच्या प्रसंगातच अरेजारे करत असे.

संध्या–संभाजीच्या चढणाऱ्या आवाजांना समुपदेशकाच्या दृष्टीनं काहीच महत्त्व नव्हतं. निरोध न वापरता संबंध झालेला आहे आणि त्याला अजून दोन तास व्हायचे आहेत, हे कळल्याबरोबर त्यांच्या मनात लागणीच्या शक्यतोत्तर प्रतिबंधाची म्हणजे तुरंत औषधं देऊन लागण व्हायच्या आत ती शक्यता निपटून टाकण्याचे विचार घोळू लागले होते. आणि, आत्ता वेळ न घालवता ते आधी करायला हवं, असं ठरवून त्यांनी परिस्थिती स्वत:च्या ताब्यात घेतली.

संध्या–संभाजीच्या वरचा आवाज काढत, त्यांनी त्यांना दोघांना गप्प केलं आणि संध्याला ताबडतोबीनं काही

औषधं घ्यायला हवीत हे सांगितलं. मात्र तिला कुठल्याही कारणानं आधीपासूनच लागण नाही ना हे त्यासाठी पाहून घ्यावं लागेल म्हणून त्यांनी तिला लगेचच रक्त तपासून घेण्यासाठी व्यवस्था करायला फोन उचलला.

दहा मिनिटात तिच्या रक्तात मुळात लागण नसल्याचा रिपोर्ट पाहातपाहात त्यांनी डॉक्टरांशी बोलून तिला लगेच औषधं मिळण्याचीही व्यवस्था केली. हे सगळं ते फक्त संध्याशी बोलत होते. संभाजीशी यातली कुठलीही चर्चा करण्याचा त्यांचा विचारच नव्हता.

त्यांनी एका रजिस्टरमध्ये नोंद केली. तिला औषधं कशी घ्यायची ते सांगितलं. आत्तापासून पुन्हा तीन महिन्यांनी येण्याची, तोपर्यंत कंडोमशिवाय संबंध न करण्याची सूचना देऊन त्यांनी त्यांच्यापुरता विषय संपवला.

''तुम्हाला काही प्रश्न असले तर तुम्ही कधीही माझ्याकडे थेट येऊ शकता.'' भेट संपवताना संध्याकडे पाहून समजुतदार चेहऱ्यानं ते म्हणाले. ''ठीक आहे, येईन मग मी तुमच्याकडे परत तीन महिन्यांनी. '' ती म्हणाली.

''हो, तीन महिन्यांनी यायला तर हवंच.'' समुपदेशक पुन्हा हसून म्हणाले. संध्या मात्र आता हसली नाही.

त्यांनी दिलेली औषधं पर्समध्ये टाकत समुपदेशकांकडे पाहत कदाचित संभाजीला म्हणाली, ''मला आत्ता बाकी काहीच बोलायचं नाहीय. मी घरी जातेय.''

संभाजीच्या अडवण्याला न जुमानता तिथून निघून आली. रस्त्यात संभाजीचा फोन आला, तोही तिनं घेतला नाही. रिक्षा, बसचा पर्याय न घेता ती चालतच निघाली. घरी पोचायला उशीर होणार होता, त्याचे अपेक्षित परिणामही होणार होते, पण तरीही, ती चालतच निघाली. मनात खूप प्रश्न होते. स्वत:शीच काहीवेळ बोलत राहिल्याशिवाय, लोकांना तोंड द्यायला आपल्याला साधायचंच नाही, हे तिला माहीत होतं.

संभाजी समोर नव्हता, तरी ती आपल्या मनातच त्याच्या वागण्याला प्रश्न विचारे. आजवर संभाजीवर प्रेम करणारं तिचं मनच तिला उत्तरे देऊ लागे, वकीलच जणू संभाजीचा!

'इतक्या दिवसात संभाजीनं मला हे का सांगितलं नाही?'

'एचआयव्ही सारख्या आजाराबद्दल संभाजीनं तुला आधीच सांगितलं असतं, तर कदाचित इथपर्यंत गोष्ट आलीच नसती. एचआयव्हीचं कळल्यावर हो कोण म्हणणार?'
'असंच काही नाही, मी समजावून घेतलं असतं.'

'संध्या, तू खरंच शहाणी बाई आहेस, समजदार आहेस. पण सामान्यपणे जसं घडतं, त्यानुरूप विचार केलास, तर त्याची फार मोठी चूक नाही असं तुला दिसेल.'

'फार मोठी चूकच आहे ही संभाजीची. एचआयव्ही कळल्यावर कुणी लग्नाला 'हो' म्हणत नाही, असं सामान्यपणे घडतं हे खरं असलं तरी म्हणून ज्याच्या प्रेमात पडायचं, त्याला फसवायचं, हा उपाय कुठल्याही मोजपट्टीवर बरोबर ठरत नाही.'

संध्याच्या मनातला संभाजीचा वकील गप्प बसला.

'शिवाय, मला आपल्या एचआयव्हीबद्दल न सांगता माझ्याशी संबंध करणं तर निश्चितच चुकीचं आहे.'

'हो, ते चुकलंच आहे, संभाजीचं. अशी गोष्ट त्याला माहीत असताना त्यानं आपल्या जोडीदाराला सांगायलाच हवी होती.'

'शिवाय आज निरोध न वापरता का केलं त्यानं? मुद्दाम, मला एचआयव्ही लागावा म्हणून?'

'तुला वाटतं का ग संध्या, संभाजी इतका दुष्ट आहे का?'

(तिचंच मन होतं ते, संभाजीवर जिवापाड प्रेम करणारं)

'आजवर असं नाही वाटलं कधी मला, पण आज काय म्हणू दुसरं? आणि...आणखी वर चिडला तो, माझ्यावरच, याला काय म्हणायचं?'

‘आपली चूक लपवायला दुसरा काही मार्गच नव्हता ना त्याच्याकडे?’

‘पण चूक असेल तर ती लपवायचीच कशासाठी?’

‘त्यानं ती चूक कबूल केली, तर त्याला माफ करशील का तू संध्या?’

तिच्याच मनात प्रश्न आला आणि ती क्षणभर जागच्याजागी थांबली. डोळे झरतच होते. आता हुंदकाही दाटून आला. पर्समधून रुमाल काढून तिनं डोळे पुसले. तिच्या मनाच्या अनेक प्रतिमा तिला दिसायला लागल्या. माणसाचं मन अनेकांगी असतं, स्वार्थाचा विचार तिच्या मनात कधी आलेलाच नाही असा तिचा स्वत:बद्दल दावा नव्हता.

पण तरीही प्रत्येक माणसाचं जगण्याचं काही एक तत्त्व असतं, त्याच्याशी प्रतारणा तिला कधीच करायची नव्हती. मनातल्या मनातच तरीही तीव्र स्वरात ती बोलू लागली. तिचा आवाज तिच्याच मनात घुमू लागला. तिच्याच प्रतिमांना ठामपणे ऐकवू लागला.

‘ त्याला माफ करावं अशी तीव्र इच्छा मला होते आहे, माझं त्याच्यावर फार प्रेम आहे. त्याला एचआयव्हीच काय कॅन्सर असता तरी मी त्याच्याशी लग्न करायला तयार झाले असते. मी लग्न करणार नाही, या भीतीनं त्यानं मला सांगितलं नाही. कदाचित त्याच कारणानं तो आत्ता चूकही कबूल करेल. पण तेही तितकंच चुकीचं नाही का? माझं प्रेम मिळवायची इच्छा असलेल्याचं माझ्यावर प्रेम हवं ना? आणि प्रेम करणं म्हणजे एकमेकांवरचा हक्क मान्य करणं. आपल्यावरचा कुणाचा हक्क आपणच एकदा मान्य केला ना, की त्या माणसाशी आपल्याला खोटं बोलताच येत नाही. अगदी भयंकर परिस्थितीत समजा चुकून बोललं गेलं, तरीही आपल्या त्या वागण्याचं समर्थन तर करताच येत नाही. इथे आपल्या संभाजीच्या मनात नात्याचा, जोडीदाराच्या, माणसाच्या हक्काचा विषयही नाही. त्याला फक्त त्याचा हेतू साध्य करून घ्यायचा आहे, मला खूप वाईट वाटतंय, पण मी नाही करणार अशा माणसाशी लग्न!’

‘त्याच्याशी लग्न करायचं नाही, ही गोष्ट माझ्यासाठीही सोपी नाही. एक तर संभाजीशिवाय या जगात माझं असं कुणी माणूस, नातेवाईक मला नाही. सख्खा भाऊ कसा नीचपणे वागू शकतो ते मी बघितलेलं आहे. भावाचं घर लवकरात लवकर मला सोडायचं आहे. तशात आजच्या प्रसंगानं, यदाकदाचित मला एचआयव्ही झाला, तर मग माझे हाल बघायलाच नकोत.’

जीवाची उलघाल सहन न होऊन संध्या हमसाहमशी रडली.

‘पण तरीही मी त्याच्याशी लग्न करणार नाही! कारण आता मी त्याच्याशी लग्न केलं, तर मी माझ्या मनाशी– माझ्या त्याच्यावरच्या प्रेमाशी– तडजोड करते आहे असंच मला वाटेल, आणि मग मला माझीच लाज जन्मभर वाटत राहील.’ हा विचार मनात आला, आणि अचानकपणे तिचे डोळे गळायचे थांबले. आतून कुठूनतरी स्वत:बद्दल बरं वाटलं.

संभाजीची बाजू घेणाऱ्या स्वत:च्याच मनाला कदाचित जिवापाड प्रेम केलेल्या संभाजीलाच साद घालत ती म्हणाली,

‘या जगात आपलं मन स्वार्थात बरबटू द्यायचं नसेल तर स्वत:वर पहाराच ठेवावा लागतो, राजा! कुठल्याही स्वार्थासाठी माझ्याकडून माझ्या प्रेमाची फसवणूक कधीही घडणार नाही, अशी काळजी मला घ्यायलाच हवी; अगदी त्यासाठी माझ्या प्रेमाचा बळी द्यायला लागला तरी....’



## संबंध करताना कंडोम वापरलाच नाही किंवा अचानक निसटला किंवा फाटला तर गर्भधारणा टाळण्यासाठी काय करता येईल ?

## तातडीच्या (इमर्जन्सी) गर्भनिरोधक गोळ्या घ्याव्यात.

- असे काही झाल्यास लवकरात लवकर एक किंवा दोन तातडीच्या गर्भनिरोधक गोळ्या घ्याव्यात.
- या गोळ्या संबंधानंतर ५ दिवसांपर्यंत घेता येतात. पण जेवढया लवकर घेतल्या जातील तेवढे बरे.
- या गोळ्या बीजांडामधून स्त्रीबीज बाहेर पडण्यास प्रतिबंध किंवा विलंब करतात व त्यामुळे गर्भधारणा रोखली जाते.
- पण स्त्री जर अगोदरच गर्भवती असेल, तर त्या गर्भावर मात्र या गोळ्यांचा काहीही परिणाम होत नाही.
- या गोळ्या सर्वच स्त्रियांसाठी सुरक्षित असतात. म्हणजे इतर गर्भनिरोधक गोळ्या किंवा इंजेक्शन्स वापरू नयेत असे डॉक्टरांनी काही कारणामुळे सांगितलेले असते, त्यांच्यासाठीही सर्वसाधारणपणे सुरक्षित असतात.
- हया गोळ्यांमुळे काही स्त्रियांना मळमळणे, पोटात दुखणे वा या प्रकारचे त्रास होऊ शकतात.
- गर्भधारणा टाळण्यासाठी आधीच ठरवून योग्य व परिणामकारक गर्भनिरोधन पध्दतीचा वापर करायला हवा, म्हणजे तातडीच्या इमर्जन्सी गर्भनिरोधक गोळ्या घेण्याची वेळ येणार नाही.

# जयश्री-धनंजय




वैऱ्यावरही येऊ नये असं म्हणतात, तशी वेळ जयश्रीसारख्या मुलीवर विशीच्या आतल्या वयात यावी ह्याला दुर्दैवाशिवाय काय म्हणायचं ?

बारावीत असतानाच लग्न झालं तिचं. लग्न ठरल्याचं कळल्यावर तिचे एक शिक्षक वडलांना 'मुलगी अजून लहान आहे, लग्न करू नका' म्हणून समजूत घालायला आले होते. पण वडलांनीच उलट त्यांची समजूत घातली.

''खूप चांगलं स्थळ आलंय, परदेशात जाऊन आलेला आहे मुलगा. इंजिनियर आहे, आमच्या जातीत तशी शिकलेली मुलं कमी दिसतात. मुलाची म्हातारी आजी आहे, तिचे डोळे मिटण्याआधी नातवाचं लग्न त्यांना करायचंय. आणि तुम्ही चिंता करू नका, तिचं शिक्षण बंद व्हायचं नाही. लग्न झालं तरी जयाला माझ्याकडंच ठेवून घेणारे मी, कॉलेजमधून नाव काढायचंच नाही आपल्याला.'' लग्नानंतर जयश्रीला तिचा नवरा कुलदैवताला नमस्कार करायला घेऊन गेला. कुलदैवत, थोडी मौजमजा, नातेवाईक असं करून महिना-दीडमहिन्यात जयश्री ठरल्याप्रमाणे माहेरी शिक्षणासाठी परत आली. त्यानंतर सातआठ महिने गेले. त्या काळात क्वचित भेटीगाठी झाल्या असतील नसतील, एवढ्यात तिचा नवरा तडकाफडकी गेला.

आधी कुणाला काही शंका आलेली नव्हती, पण शेवटचे तीनचार महिने तो बराचसा काळ हॉस्पीटलातच होता. जयश्रीला याबद्दल कुणीच फारसं सांगितलं नाही.

'तो थोडा आजारी आहे, पण ठीक आहे, परीक्षा झाली की ये' असं सासरे म्हणाले होते. नवऱ्याशी थेट फारसं बोलणं होतच नसे. तो तसा अबोलच होता. कामात असे किंवा वाचत बसलेला असे. नवराबायकोचं नातं म्हणजे क्वचित सासरी जाणं, तिथं गेल्यावर दिवसा सासूनं कौतुक करणं आणि रात्री नवऱ्यानं संबंध; एवढंच जयश्रीला माहीत होतं.

मग तो गेल्याचंच कळलं. जयश्रीला घेऊन वडील तिच्या सासरी गेले. परत येतानाही तिला घेऊनच आले. नवऱ्याचं मृत शरीर पाहून जयश्रीला भयंकर भीती वाटली. किती म्हटलं, तरी काही वेळा तरी प्रेमानं उराशी धरलेलं ते शरीर आता अगदी खंगलेलं दिसत होतं. कुणीतरी अस्पष्टसं म्हटलं, ''त्याला एड्स होता की काय''. पण नंतर त्यावर कुणीच काही बोललं नाही.

'पाव्हण्यांसमोर असलं काही बोलायचं नाही' असं त्यांचं ठरलेलं असावं.

जयश्री आणि तिचे वडील 'एड्स' या शब्दानं दचकले. त्यांनी चार उलटसुलट प्रश्नही विचारले, पण हाती काही लागलं नाही.

'आपली फसवणूक झाली की काय, पण असेल, तरी आता कशाचा काय उपयोग होणार? आपलं नशीब म्हणायचं आणि गप्प बसायचं.' परत येताना जयश्रीचे वडील स्वत:शीच बोलल्यासारखे म्हणाले.

दोघं परतली.

''झालं ते झालं, दादा, आपली लेक अजून लहानच आहे, तिचं दुसरं लग्न करून द्यायचं. नशीबानं मूलबाळ काही नाही, सरळ नवीन आयुष्याला सुरवात करायची.'' जयश्रीची आत्या म्हणाली.

'' एका लग्नात अपयश आलंय, मुलीला बाशिंगबळ कमी पडलंय. आता जरा थांबा, शिकू दे तोवर पोरीला.'' आत्यांच्या विरोधी मत देत आत्तोबा म्हणाले.

'' तुम्हाला काय कळतंय, विधवा बाईला जगात किंमत नसती. तिचा गैरफायदा घ्यायला बघतात पुरूष.'' त्यांची नेहमीप्रमाणे जुंपली.

जयश्रीच्या मनातून एड्सचा विषय गेला नाही. तालुक्याला काही कामासाठी गेलेली असताना ती एकटीच ग्रामीण रुग्णालयात गेली. वेगळं नाव सांगून तिनं स्वत:ची तपासणीही करून घेतली. तपासणीचा निकाल तिला शंका होती, तसाच होता. तिच्यावर आभाळ कोसळलं.

'ही गोष्ट कुणालाच सांगायची नाही, आपल्याही वागण्यात आपल्याला एड्स असल्याचं कुणालाही जाणवलं नाही पाहिजे. जगू तोवर जगू, नाहीतर, आपला नवरा मेला, 'तशा आपणही मरून जाऊ.' तिनं ठरवून टाकलं.

पुन्हा लग्न करण्याचा विचार आता तर जयश्रीच्या मनात नव्हताच. आता वडलांनी पुन्हा स्थळ आणलं तर विरोध करायचा, हेही तिनं ठरवलेलं होतं. मागच्याच वेळी आपण विरोध करायला हवा होता, केला असता तर झालं ते सगळंच टळलं असतं.

पण आत्तीचं म्हणणंही खरंच होतं. ती विधवा झाली हा तिचाच दोष असल्यासारखं कुणी तिला बोल लावत असे. तिची आपल्याला फार काळजी आहे, असं दाखवत अतिसलगीनं कुणी वागे. 'शिकण्यापेक्षा आता घरातली कामंच करावी, इतरांचा आनंद पाहायला मिळतोय, त्यातच समाधान मानावं,' असं तिनं ऐकावं, म्हणून मुद्दाम मोठ्यानं म्हटलं जाई. लग्नापर्यंत ती घरातली लाडकी मुलगी होती. अभ्यासात हुषार होती. परीक्षांमध्ये भावांपेक्षाही तिला जास्त गुण मिळत, ह्याचं कौतुक होई. आता विषय निघाला की 'पण उपयोग काय त्या हुषारीचा, नवऱ्याला वाचवायला काही उपयोगी पडली नाही ती

हुषारी!' असली तर्कहीन विधानं केली जात. वडलांची ती लाडकी होती. पण तेही आता गप्पगप्प असत. जयश्री सोडून सर्वांची आयुष्यं सुखानं चालली होती, एकटी जयश्री निराशपणे एक एक दिवस ढकलत जगत होती.


धनंजय तिच्या आत्याचा पुतण्या. तिच्याहून चार वर्षांनी मोठा. आत्याची मुलं जयश्रीहून लहान, म्हणून लहानपणी धनंजयशी जयश्रीचं लग्न लावायचा विषय घरगुती गप्पांच्यात व्हायचा. पुढे जयश्रीच्या वडलांनी तिच्या लग्नाचा वेगळाच विचार केला आणि धनंजयचा विषय मागंच राहिला. धन्या अनेकदा घरी यायचा. जयश्रीला काहीबाही वाचायला द्यायचा. फार शिकलेला नव्हता तरी तो चांगला हुशार मुलगा होता. वरपांगी काहीसा उर्मट वाटला तरी मनानं प्रेमळ होता. जयश्रीशी त्याची आधीपासूनच थोडीफार सलगी असे, आता त्यात जरा भर पडली होती. कधी रात्री जेवण झाल्यावर तो तिला 'चक्कर मारायला जाऊ' म्हणायचा. घरच्यांनी तिला जाऊ दिलं नाही, तर अपमान न वाटून घेता घराच्या गच्चीवर तिला गप्पा मारायला न्यायचा. आता कुणी तसं चिडवण्याचा प्रश्नच नव्हता. विधवा भाचीशी धन्याचं लग्न लावण्याचा विचार आत्याचाही नव्हता.

धनंजयशी बोलायला जयश्रीलाही आवडायचं.

धनंजयचं वागणं मोकळंढाकळं असे. बोलता बोलता सहज स्पर्श करायचा. टाळी मागायचा. ' 'तुला हा रंग लई खुलतो म्हणायचा.' त्यानंच तिला मोबाईल भेट दिला होता. त्यावर अनेकदा त्याचा फोन यायचा. तो तिचीच काय घरातल्या इतरांचीही चेष्टा करायचा. सर्वांना हसवायचा, पण त्याचा हा सगळा प्रयत्न मुख्यत: तिला हसवायसाठीच असतो, हे जयश्रीला कुणी सांगायची गरज नव्हती.

धनंजयशी बोलताना तिच्या चेहऱ्यावर हसू असतं, याचं वडलांना बरं वाटे. 'आपण बिचारीच्या आयुष्याचा सत्यानाश केला,' वडील एकटे असताना, टिपं गाळत, स्वत:लाच कोचत.

काही महिने असेच गेले. आता धनंजयच्या मनात काय चाललंय, ते इतर सर्वांना नाही, तरी जयश्रीला समजायला लागलं. सहज बोलताबोलता तो तिचा हात हातात घट्ट धरे. त्याच्या आयुष्यातलं 'जयश्रीचं स्थान कुणीही हिरावून घेऊ शकत नाही' म्हणे. त्याचं धाडस वाढायला लागलं होतं.



सुरवातीला जयश्री त्याची समजूत काढू पाही. ''धनंजय, मला आता असल्या गोष्टीत रस नाही, आणि तुझी काकी तर तुला माझ्याशी लग्न करूच देणार नाही.''

''ते मी माझं पाहील,'' तो म्हणे, ''आपन कुनाला मानत नाही अन् घाबरतबी न्हाई.'' जयश्रीला त्याच्या या अशा बेफिकीर वागण्याचा मोह पडे. त्यामुळे त्याला विरोध करायला तिला जमायचंच नाही.


पण नंतर 'आपण एक विधवा, त्यातून आपल्याला एचआयव्ही आहे आणि आपल्या मनात हे असले विचार येतातच कसे,' असा स्वत:चाच राग येत राही. 'ह्यातून आणखी काही होऊन बसलं म्हणजे?'

'धन्यासारखा दांडगा माणूस आपल्याला या प्रेमाच्या वाटेनं आणखी पुढे घेऊन जायला लागला तर? आपल्याला एचआयव्ही आहे हे त्याला सांगायला पाहिजे आपण, म्हणजे मग जाईल सोडून. पण तसं झालं, तर आपल्याला किती वाईट वाटेल? म्हणजे प्रेमबिम सगळं झूट. एचआयव्ही असला तर माणूस माणसाला सोडून जाणार. त्यापेक्षा आपण हे गाव, हे घर सोडून कुठेतरी पळून जायला हवं की हे जगच सोडून जावं, म्हणजे कशाचाच प्रश्न नाही. आपल्या आयुष्यात कुठलेही आनंद नाहीत की आता कधी सुखाचा स्पर्श नाही.'

'पण काय करावं, सांगावं का धनंजयला? मान्य करेल का तो? आत्ता करेलही मान्य कदाचित, पण पुढे काय, एकतर आयुष्यभर त्याच्या उपकाराच्या ओझ्याखाली आपण जगणार. आणि जगणार तरी किती?'

निराश मनानं ती आपल्या खोलीत बसून होती. अचानक काहीतरी आठवून तिनं आपली पर्स पुढे ओढली. कधीतरी एक जाहिरात पाहून तिनं तो नंबर लिहून घेतला होता. 'एचआयव्ही बद्दलचे प्रश्न विचारायचे असले तर...' त्याची तिला आठवण झाली. पर्समधून तिनं तो कागद शोधून काढला आणि मोबाईलवर त्यांना फोन लावला. तिची छाती धडधडत होती. पलीकडून एक बाई बोलत होत्या. वयस्कर असाव्या, त्यांनी जयश्रीला '' काही प्रश्न मनात आहेत का, मला सांगतेस का?'' असं मायेनं म्हटलं.

जयश्रीचं सगळं म्हणणं अगदी शांतपणे ऐकून घेतलं. मग म्हणाल्या, ''पहिली गोष्ट, म्हणजे स्वत:ची प्रकृती तुला नीट ठेवायलाच हवी, त्यासाठी उपचार घ्यायलाच हवे. एचआयव्ही असला, तरी आता चांगली औषधं आहेत, तुझी तब्येत उत्तम राहील. छान जगशील तू, मरणाचा विचारही करू नकोस. पुन्हा लग्न केलंस तरी हरकत नाही. मूल व्हायलाही काही आडकाठी नाही. मात्र या सगळ्यात संवादाचा मार्ग खुला ठेवायचा. तुझा तो मित्र कदाचित 'नाही' म्हणेल पण त्याला अंधारात ठेवणं बरोबर नाही. त्याला सांगायला तर हवंच; आणि तो 'नाही' म्हणेल असं तरी आपण का धरायचं? एचआयव्हीच्या भीतीहून प्रेम खूप वरच्या पातळीवर असतं.



आणि त्याचा विषय एकवेळ बाजूला ठेव, पण एचआयव्ही असला म्हणून, प्रत्येक माणसाला ज्या भावना असतात त्या तुलाही असणार ना, तेव्हा तुझ्या मनात त्याच्याबद्दल भावना आल्या, यात मला तरी चुकीचं असं काहीच दिसत नाही.''

फोन बंद करताना तिला धनंजयचा मिस्ड कॉल दिसला. काय करावं? जयश्रीनं हातातला मोबाईल फोन क्षणभर प्रेमानं कुरवाळला. मग स्वत:शी हसत म्हणाली,

‘संवादाचा मार्ग खुला करणे हेच ते उत्तर! सगळं साचलेपण तसंच ठेवून त्या कोंदटलेपणातच दिवस–दिवस खेचत राहण्यापेक्षा मोकळेपणानं काय करता येईल ते पाहावं हे बरं.’

काय करावं, कसं करावं?

‘आता चांगली औषधं असतात. चांगल्या डॉक्टरांचा पत्ता काढू. त्या बाई इतक्या चांगल्या बोलल्या; त्यांनाही विचारायला हरकत नाही. मुख्य म्हणजे चांगल्या जगण्याचा विचार मनात ठेवून धनंजयशी सगळं एकदा संगतवार बोलून घ्यावं. त्याच्या सोबतीनंच एकदा शहरात जावं, एचआयव्हीचे उपचार करणाऱ्या दवाखान्याचा पत्ता शोधावा, धनंजयशी तर अगदी मोकळेपणी बोलावं. त्याला नाही म्हणावंसं वाटलं तर त्याला कुठलाही दोष न देता आपण मान्य करू, याची खात्री द्यावी . त्याला जर मान्य असलं, तो हो म्हणाला, तर दोघं मिळून घरच्यांना सांगू. नाही म्हणाला, तर ती शेवटचीच भेट आपल्या मित्रासोबतीची. त्याच्यासोबत असण्याचे काही सुखाचे दिवस वाट्याला आले, तेवढेच आपल्या नशिबात होते असं म्हणू आणि आपल्या मनाची समजूत घालू. यापेक्षा वेगळं काय आहे आपल्या हातात?

आपण काही न करता आपल्याला हवी तशीच जीवनाची नदी वाहत राहील, अशी अपेक्षा कशी करायची? त्यापेक्षा आपणच पुढं झालं पाहिजे, काहीतरी करून पाहिलं पाहिजे, नाही का?’ स्वत:शी इतकं मनापासून बोलून झाल्यावर तिनं धनंजयला फोन लावला. मोबाईलवर त्याचा रिंगटोन तिला ऐकू आला.

‘‘तेरे बीना जिंदगीसे कोई, शिकवा तो नहीं......’’ ऐकताना तिच्या छातीत धडधडलं, अगदी गोड धडधडलं.



# चित्तरूपा-शरद

मधुचंद्राहून परत येतायेता, चित्तरूपाच्या अचानक पोटात दुखायला लागलं. शरदनं जवळजवळ उचलूनच तिला हॉस्पिटलमध्ये नेलं. अॅपेंडीक्सचं दुखणं निघालं, म्हणून ताबडतोब ऑपरेशन करायचं ठरलं. ऑपरेशन झालं. पण त्यानंतर हॉस्पिटलमध्ये असतानाच डॉक्टरांनी दोघांनाही 'जरा बोलायचं आहे' असं म्हणून बोलावून घेतलं. ऑपरेशनच्या आधी चित्तरूपाला प्रयोगशाळेत पाठवून तिच्या रक्त, लघवी वगैरे नेहमीच्या तपासण्याही त्यांनी करून घेतल्या होत्या. त्यात एचआयव्हीची तपासणीही होतीच. या तपासणीत चित्तरूपाला एचआयव्ही असल्याचं निघालं होतं. ते सांगण्यासाठीच डॉक्टरांनी त्यांना भेटायला बोलावलं होतं.

चित्तरूपा आणि शरद दोघंही हा प्रकार ऐकून चक्रावलेच. हे सगळंच त्यांना अगदी अनपेक्षित होतं. दोघंही शिकलेले होते, एकंदर समाजाला माहीत असतं, तेवढी या आजाराबद्दलची माहितीही त्यांना होती. तरीही, हा आजार कशाकशातून होतो, त्या विषयातले तज्ज्ञ डॉक्टर कुठले, औषधं, तपासण्या कुठल्या वगैरे माहिती डॉक्टरांनी दिलीच. ''आमच्या हॉस्पिटलमध्ये आम्ही अशा रूग्णावरही शस्त्रक्रिया करतो'' हेही मोठ्या अभिमानानं सांगितलं. आपल्या मनाची झालेली अनावर अवस्था लपवत दोघांनीही काही प्रश्न डॉक्टरांना विचारले. डॉक्टरांनी शरदलाही त्याची तपासणी करून घ्यायला सांगितलं. शरदच्या रक्तात एचआयव्ही असल्याचं निघालं नाही. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली की, चित्तरुपाला लग्नाच्या आधीपासून एचआयव्ही होता. अर्थात तिला त्याबद्दल काहीच कल्पना आत्तापर्यंत नव्हती. तिला कशातून एचआयव्ही झाला असेल, याबद्दल तिलाही काहीच अंदाज सांगता येत नव्हता. आता त्यावर विचार करण्यात काहीच अर्थ नव्हता. डॉक्टर जरा विचारात पडले. दोघं नुकतेच मधुचंद्राहून येत आहेत, म्हणजे शरदला लागण व्हायची शक्यता त्यांनी बोलून दाखवली. मग एकदम अस्वस्थ होऊन विचारलं,

''कंडोम वगैरे काही वापरला का तुम्ही तिथे?''

''नाही बुवा. ''

''आता एक काम करा, येते तीन महिने कंडोम वापरा आणि मग तुमची तपासणी पुन्हा एकदा करून घ्या. लग्नापूर्वी तुम्हाला एचआयव्ही नव्हता, पण... आता कदाचित झालेला असेलही. अर्थात आणखी तीन महिने या तपासणीत तो दिसणार नाही, त्यामुळे त्यानंतरच तपासून पाहावं लागेल. म्हणजे झालेला असेलच, असा काही नियम नाही, पण शक्यता तर आहेच, म्हणून... नसेल अशी आत्ता आपण आशा करूया.'' ते काहीसे अडखळत म्हणाले.

जीवनात आलेल्या ह्या अचानक वळणानं चित्तरूपा खूपच उदास झाली. पण शरदनंच तिला सावरलं.

'आयुष्यात वेगवेगळे प्रश्न येतच असतात. आपण निराश होऊन फारसं काही बरं घडत नाही' असा शरदचा एकंदर दृष्टिकोण होता. चित्तरूपाची त्यानं हरप्रकारे समजूत काढली.

चित्तरूपाही विचारी मुलगी होती. 'आपल्याशी लग्न झाल्यानं नकळत शरदची एकप्रकारे फसवणूकच झालेली आहे, असं शरदला वाटलं, तर त्यात काही गैर नाही,' असा विचार करून तिनं प्रथम शरदला सरळ 'तुला घटस्फोट हवाय का?' असंच विचारलं. शरदनं 'अजिबात नाही' असं सांगितल्यावर तिनं तेही तितक्याच सरळपणानं मानलं.

तीन महिने संपले. त्यानंतर केलेली शरदची तपासणीही

पहिल्याप्रमाणेच निर्दोष आली. चित्तरूपाला याचा फारच आनंद झाला. एचआयव्ही असूनही चित्तरूपा–शरदचा संसार अगदी आनंदानं सुरू झाला. नाही म्हणायला, संबंधांचं प्रमाण तसं खूप कमी होतं. शरदच्या तपासणीआधीचे पहिले तीन महिने तर दोघांनाही संबंध करावेसेच वाटले नाहीत. मग हळूहळू कंडोम वापरून करायला सुरूवात झाली. त्यात थोडा त्रास वाटायचा, नाही असं नाही, पण त्या दोघांना एकमेकांची ओढ इतकी वाटे की कंडोम वापरण्यातली मजाही ते शोधून काढत असत. चित्तरूपाला एचआयव्ही आहे हे एक सत्य सोडता, दोघांनीही आपल्या एकत्र जीवनावर या घटनेचा फारसा परिणाम करून घेतला नव्हता; त्यातल्या आनंदाला दूर लोटलं नव्हतं. डॉक्टरांकडे ठरावीक दिवसांनी जाणं, प्रतिकारशक्तीची पातळी सांगणाऱ्या सीडी४ पेशींची तपासणी एवढ्या गोष्टी वाढल्या होत्या, पण तितकंच. दोघांच्या नोकऱ्या, फिरायला जाणं, सिनेमे पाहणं, एकमेकांसोबत फिरणं, मित्रमंडळींना जेवायला बोलावणं, अगत्यानं चार चवदार पदार्थ करणं, कधी हॉटेलात जेवायला जाणं. हे सगळं दोघंही अगदी मनापासून करत होते. मुख्य म्हणजे त्यांचं एकमेकांवर मनापासून प्रेम होतं. आयुष्यात नेमकं काय साधायचं, याच्या कल्पना स्पष्ट होत्या. एचआयव्हीनं त्यात काहीही फरक पडला नव्हता. तीन–चार वर्ष उलटली. चित्तरूपाचे सीडी४ कमी होतायत, असं दिसल्यावर डॉक्टरांनी तिची औषधं सुरू केली.

त्या दिवशी क्षणभर चित्तरूपाच्या डोळ्यांत पाणी तरळलं. शरदला ते दिसलं. समोर डॉक्टर आहेत याचाही विधिनिषेध न बाळगता त्यानं तिला घट्ट जवळ धरलं.

एक मिनिटभर जग थांबलं. कुणी काहीच बोललं नाही.



एका मिनिटानंतर चित्तरूपाच्या चेहऱ्यावर नेहमीचे हसरे भाव होते.  डॉक्टरांच्या सल्ल्यानं औषधं सुरू झाली.

चित्तरूपा औषधं अगदी मनोभावे घेत असे. औषधांचा कंटाळा तिनं केलाही नाही; शिवाय शरदही आठवण करायचाच. दोघांनी कुणा नातेवाईकांना यात गोवलंही नव्हतं. अगदी जवळच्या  काही मित्रमंडळींना माहीत होतं, त्यांचीही मदतच असे. आयुष्य एचआयव्हीनं बदलत नाही हे सिद्ध करायलाच, जसे हे दोघंजण एकमेकांना भेटले होते. दोघांच्या नोकऱ्या सुरू होत्या. पैशाची कमतरता म्हणावी अशी नव्हती. औषधं सुरू झाल्यावरही तीन वर्ष उलटली. जणू कुठे उडून गेली, कळलंही नाही.

'मूल हवं की नको' असा विचार सुरूवातीला कधीतरी चर्चेत आला होता, पण

'एकमेकांना आधी वेळ देऊया, आणि नंतर मुलाबाळाचा विचार करू 'असं म्हणून दोघांनीही तो विषय सोडूनच दिला होता. दोघांच्याही आईवडिलांनी कधीकधी आडूनआडून, कधी थेटपणे तसा प्रश्न विचारला होता पण तेव्हा शरदनंच 'आम्हाला इतक्या लवकर काही नकोय' असं म्हणून त्यांना टोलवलं होतं.



मिलिंद साठे शरदचा कॉलेजपासूनचा मित्र! मधली बरीच वर्ष तो अमेरिकेत होता. आता पुन्हा भारतात आला होता.त्याच्या घरी शरद चित्तरूपांना जेवायला बोलावलं होतं. मिलिंद, स्वाती, आणि त्यांचं छोटं पिल्लू असीमा यांना भेटून शरद-चित्तरूपाला खूप आनंद झाला. ते दोघंही हौशी होते, एकंदरीनं आनंदी होते.

पण शरदच्या दृष्टीनं त्यांच्या घरातली सर्वात खास बात होती, असीमा!

असीमा शरदला फारच आवडली. त्यांच्या घरात गेल्यापासून त्यानं असीमाशी दोस्ती जुळवली होती. आधी जरा काही म्हटलं की आईच्या कुशीत मान लपवणारी असीमाही काही वेळानं शरदकाकाला तिच्याशी खेळायला बोलवायला लागली. शरद तिच्याशी इतका मनापासून खेळत होता ते बघून चित्तरूपाच काय मिलिंदही चकीत झाला. इतक्या दिवसांनी भेटलेल्या मिलिंदशी देखील त्यानं फार गप्पा मारल्या नाहीत. सर्व वेळ तो असीमाशीच खेळत होता. ते बघता बघता इतक्या दिवसात फारसा विचारात न घेतलेला प्रश्न आता चित्तरूपाला एकदम सतावायला लागला. डॉक्टरांकडे जाण्याबद्दल सुरवातीला चित्तरूपाला मनातून दडपण यायचं. पण नंतर तिनं स्वतःला सावरलं. यावेळी डॉक्टरांकडे गेल्यावर चित्तरूपानंच त्यांच्याशीच तो विषय काढला, तेव्हा शरदही थक्क झाला.

वक्तृत्त्वस्पर्धेत भाग घेणारी लहान मुलं जशी तोंडपाठ केलेली वाक्यं ऐनवेळी म्हणताना अडखळतात, तसं अडखळत आणि घाईघाईनं चित्तरूपा म्हणाली, ''कुठल्याही किंमतीवर शरदला एचआयव्ही लागलेला मला चालणार नाही. पण मग कंडोम वापरत राहिलं, तर मूल कसं राहणार, की आम्हाला स्वत:चं मूल होईल हा विचार आम्ही विसरूनच जायला हवा ? ''

''इतकं अवघड काही वाटून घ्यायची गरज नाही, चित्तरूपाताई,'' डॉक्टर तिच्या काहीशा बावरलेल्या चेहऱ्याकडे पाहात हसून म्हणाले, ''फारसं काहीच करावं लागणार नाही, कंडोमशिवाय संबंध करायचीही गरज नाही, कृत्रिमरित्या वीर्य गर्भाशयात सोडता येईल ना. त्यानं राहतील तुम्हाला दिवस. ''

''मला विचारलं असतंस आधी, तर मीही हे सांगितलं असतं, एवढा विचार आपणही करू शकतो.'' डॉक्टरांच्या सोबतीनं तिला चिडवत हसून शरद म्हणाला.

''पण बाळाला नाही ना होणार एचआयव्ही ?''

''बाळाला लागण न होण्यासाठी आता उपाय आहेत ना, आणि तुम्ही तर आधीच औषधांवर आहात तेव्हा वेगळी काही औषधंही घ्यावी लागणार नाहीत.''

शाळेत असताना भूमितीच्या परीक्षेतले कूटप्रश्न ती जशी सहजपणे सोडवत असे, तितक्याच सहजपणे तिला पडलेले प्रश्न डॉक्टरांनी सोडवून दिले.

चित्तरूपाला वाटलं, 'उगाच काळजीत पडलो आपण, आयुष्यातले प्रश्न तसे सोपेच असतात, उत्तरं असतातच की त्यांना.' आपण प्रेग्नंट आहोत, आपलं पोट मोठ्ठं झालंय, आपलं बाळ पोटातल्या पोटातच हसतंय, आपल्याशी बोलतंय, अशी मजेशीरच दिवास्वप्नं तिला एकदम दिसायला लागली, हसूच यायला लागलं. डॉक्टरांकडून निघून घरी जाताना तिनं मध्येच एकदा शरदच्या गळ्यात सहजच हात टाकले, आणि त्याला जवळ घेतलं.

शरद हसला, ''स्वत:चा बावळटपणा उघडा पडलाय म्हणून आता लाडीगोडी लावतेयस होय ग, वेडी !''



## कृत्रिम गर्भधारणा

जोडप्यातील फक्त एकालाच एच.आय.व्ही.ची लागण असेल व त्यांना मूल हवं असेल तर नैसर्गिक पद्धतीने (लैंगिक संबंधांतून) गरोदर राहण्यामध्ये दुसऱ्या जोडीदाराला एच.आय.व्ही. लागणीचा धोका असतो. तो टाळण्यासाठी कृत्रिम गर्भधारणेचा पर्याय घेता येतो.

***जर स्त्रीला एच.आय.व्ही.ची लागण असेल व तिच्या जोडीदाराला मात्र नसेल...***

- अशा वेळी कृत्रिमरित्या शुक्राणू योनिमार्गात सोडण्याचा पर्याय योग्य ठरू शकेल.
- ही पद्धत सोपी असून, स्त्री स्वतःच ही पद्धत वापरू शकते.
- याबद्दल अधिक माहिती हवी असल्यास, तुमच्या समुपदेशक / डॉक्टरांशी बोला.

***पुरुषाला एच.आय.व्ही.ची लागण असेल व जोडीदार स्त्रीला मात्र नसेल...***

- ह्या परिस्थितीतही कृत्रिम गर्भधारणेचा उपाय करता येतो. काही विशिष्ट पद्धतीने पुरुषाच्या धातूमधून शुक्राणू वेगळे करता येऊ शकतात, असे वेगळे केलेले शुक्राणू (ज्यात एच.आय.व्ही.चे विषाणू नाहीत) स्त्रीच्या योनिमार्गात सोडता येऊ शकतात. किंवा शुक्राणू व स्त्रीबीज यांचे शरीराबाहेर फलन करून नंतर तो गर्भ, गर्भाशयात ठेवता येतो.
- किंवा संपूर्णपणे अनोळखी दात्याकडून वीर्य घेऊन कृत्रिम गर्भधारणा करून घेता येते.

# दोघी



हॉस्पिटलमध्ये लिफ्टच्या दाराशीच सुनंदा भेटली.

''अय्या, वैशाली, वैशूच ना तू?'' ती हसून म्हणाली.

''सुनंदा?'' वैशालीनंही तिला ओळखलं.

''किती वर्षांनी ग!''

कॉलेजच्या दिवसात एका वर्गात होत्या दोघीजणी. किती वर्ष झाली त्याला, आठ की दहा! त्यानंतर दोघींनाही एकमेकींबद्दल काहीच कळलं नव्हतं. आता इतक्या वर्षांनी पुन्हा इथे हॉस्पिटलमध्ये! म्हणजे कदाचित दु:खाच्या फुफाट्यातून चालताचालता, की काय? एकमेकींकडे बघताना दोघींनाही क्षणभर जुने दिवस आठवले.

आत्ताही फारतर तिशीच्या होत्या त्या. पण एव्हाना दोघींचेही अवतार बदललेले होते. काळजीनं कपाळावर साठलेली एक उभी आठी, केसात क्वचित कुठे पांढरी जर; आणि मुख्य म्हणजे मनातले विचार लपवण्यासाठी चेहऱ्यावर ताणून बसवलेलं एक निर्विकार हसू.

''इकडे कुठे तू? कोण ॲडमीट आहे?''

सुनंदाच्या हातातली औषधांची यादी आणि स्टोअरमधलं खोकं पाहून वैशालीनं विचारलं.

''हे.'' हे एकाक्षरी उत्तर देताना सुनंदाच्या चेहऱ्यावर अनेक भाव तरळून गेले.

'' पण तू कशी ग इथे? तुझं कोण ॲडमीट आहे?''

''मी इथल्या लॅबमध्ये नोकरीला आहे.; मिस्टर कुठे आहेत म्हणालीस तुझे?''

'' ॲडमीट आहेत, म्हणाले ना.''

''ते कळलं, पण कुठे आहेत? कुठल्या विभागात आहेत? कुणाच्या अंडर ॲडमीट आहेत?'' पेशंटला विचारतात, तशा वरच्या सुरात विचारलेल्या वैशालीच्या प्रश्नाला उत्तर देताना सुनंदा काहीशी अडखळली.

वैशालीच्या ते लक्षात आलं. सुनंदानं देशपांडे डॉक्टरांचं नाव घेतल्यावर तर तिला त्या अडखळण्याचा अर्थही कळला. न बोलण्यासारख्या अनेक गोष्टी होत्या;तरीही अनेक वर्षांनी जुन्या वर्गमैत्रिणी भेटल्या की 'आपला संसार कसा छान चाललाय, मुलं कशी हुशार आहेत,' वगैरे एकमेकींना भरभरून सांगतात तशा त्याही दोघीजणी तिथेच. जिन्याच्या कोपऱ्यात उभ्या राहून आनंदानं एकमेकींशी बोलल्या.

''चल ग. निघते, उशीर झालाय, लंच अवरमध्ये येईन भेटायला.''

असं म्हणून सुनंदाची सुटका करत आणि आपलीही करून घेत वैशाली वळली, आणि पुन्हा मान वळवून तिनं विचारलं,

''नाव काय तुझ्या मिस्टरांचं?''

विभागात येऊन कपाटात पर्स ठेवत वैशालीनं संगणक सुरू केला, फाईल समोर ओढली आणि नेहमीची कामं सुरू

केली, आणि त्याच बरोबर सुनंदाच्या नवऱ्याचा काही रिपोर्ट आपल्या विभागातून केलेलाय का, हेही बघितलं. तेवढ्यासाठी नाव विचारून ठेवलेलंच होतं. तिचा अंदाज खराच होता. सीडी४ आणि व्हायरल लोडचे रिपोर्टस केलेले दिसत होते. वैशालीच्या डोळ्यात उगाचच पाणी भरून आलं.

वर्षभरापूर्वी आपल्या आयुष्यात जे घडलं, तसंच काहीसं सुनंदाच्याही वाट्याला आलेलं तिला दिसायला लागलं.

वर्षभरापूर्वी एक दिवस वैशालीला आपल्या कपाळावर काही फोड दिसले. मुरमाचे असावे असेच. खरं म्हणजे कुणाला दाखववं, असंही आधी वाटत नव्हतं. पण जरा जास्त आग होत होती, म्हणून एरवीप्रमाणे कुठलं तरी क्रीम न लावता ती हॉस्पिटलमधल्या डॉक्टरांकडेच गेली.

''ही नागीण होतेय तुम्हाला,'' ते म्हणाले, त्यांनी गोळ्याही लिहून दिल्या. त्या गोळ्यांनी ती नागीण वर येतायेता दबली. दोन दिवसांनी ती पुन्हा सांगायला गेली होती तेव्हा डॉक्टरांनी एचआयव्हीसाठी तपासणी करायला सांगितली.

''काही तरी काय, मला कसला आलाय एड्स'' असं म्हणत, डॉक्टरांच्या मनाचं समाधान व्हावं म्हणून हसतहसत तिनं स्वतःच ती टेस्ट करून घेतली. टेस्टचा निकाल बघताना मात्र ती थक्कच झाली होती.


''कसं काय?'' तिनं डॉक्टरांनाच विचारलं.

ते तरी काय उत्तर देणार !

''सर, विलासला असणार एचआयव्ही आणि त्याच्याकडूनच तो माझ्याकडे आलेला असणार.'' ती थरथरत म्हणाली, आणि रजा टाकून घरी निघून गेली.

दुसऱ्याच दिवशी विलासचीही तपासणी झाली. पण आश्चर्याची पराकाष्ठा म्हणजे विलासच्या रक्तात एचआयव्ही नव्हताच.

दोघांपैकी एकालाच एचआयव्ही आहे, आणि दुसऱ्याला नाही, ही त्यातल्यात्यात चांगली म्हणावी अशी बाब. पण फक्त बायकोला एचआयव्ही आहे, म्हणजे तिनं आपल्याशी प्रतारणा केलेली आहे, व्यभिचार केलेला आहे, असाच अर्थ घेणारा तिचा नवरा असल्यामुळे आता प्रत्येक दिवस त्याच्या छळात जळत काढण्याचं नशिब तिच्या वाट्याला आलेलं होतं.



आयुष्यात आधीपासून प्रश्न नव्हते असं काही नाही, ते होतेच. कष्ट, नवऱ्याचा जाच, त्याची लहानसहान गोष्टींमधेही दिसणारी फसवेगिरी, सासरच्यांचा शहाजोगपणा, सगळं नेहमीप्रमाणे होतंच. माहेरचा फारसा आधार नव्हता पण सौरभ नावाचं एक पाच वर्षांचं सोनं पदरात होतं, नोकरी होती; आणि कधीकधी विलासही प्रेमानं वागत असे येवढ्यावर ती सारं निभावून नेत होती! पण एचआयव्ही कळल्यापासून एक सौरभ सोडला तर बाकी सगळंच कठीण होऊन बसलं होतं. सुनंदाच्या नवऱ्याचा, हेमंत शेडबाळकरचा रिपोर्ट होता. पण सुनंदाचं काय? तिलाही असणारच ना, की नाहीय? वैशालीनं देशपांडे युनिटला असलेल्या पांडे सिस्टरना सहजच शेडबाळकर पेशंटबद्दल विचारल्यासारखं विचारलं. ''त्या पेशंटच्या बायकोला एचआयव्ही नाहीय, त्यालाच आहे फक्त! किती छळतो अग पण तो तिला. सारख्या हाका. हे कर, ते दे, कॉफी आण, पाय चेप. बेकार माणूस आहे अगदी!''

खरं म्हणजे पांडेसिस्टरनं शेडबाळकरांबद्दलची खाजगी माहिती दुसऱ्या माणसाला सांगायला नको, पण वैशाली त्याच हॉस्पिटलमध्ये नोकरी करत असल्यानं आणि शेडबाळकर पेशंटच्या बायकोची दया येत असल्यानं त्या बोलून गेल्या. सुनंदाला एचआयव्ही नाही हे ऐकून वैशालीला आनंद झाला. क्षणभर सुनंदाचा काहीसा हेवा वाटला.

''कुणालाच एचआयव्ही असू नाही, पण त्यातही असणारच असेल आणि तोही एकालाच, तर तो नवऱ्यालाच असायला हवा. आपल्याला एकटीलाच एचआयव्ही असल्यानं विलासला एकदम 'बा इज्ज़त बा मुलाहिजा' सुटका मिळालीय; आणि दोषाचं संपूर्ण खापर माझ्या माथी आलंय. सुनंदाचं त्यामानानं बरं!''

विचार करता करता तिलाच आपली चूक जाणवली.

सुनंदाला एचआयव्ही नसला, नवऱ्याला असला, तरी तिच्या घरी आपल्या घराच्या उलटी परिस्थिती नाहीय. उलट तो नवरा तिला किती छळतो असंच पांडे सिस्टर सांगत होत्या,

निदान आपण तिच्याशी बोलायला तरी हवं. आपल्याशिवाय तिची परिस्थिती कुणाला कळणार. 'आपण सुनंदाला भेटायला जायलाच हवं.'

''माझीच काहीतरी भानगड आहे, त्यातूनच मला आजार लागलाय, असाच निष्कर्ष विलासनं काढलाय.'' सुनंदा समोर बसून वैशालीनं सगळा पाढा वाचला. ''त्याच्या हातात जणू त्याचा पुरावाच आलाय. बिनदिक्कतपणे माझी जाहीर नालस्ती करायचा परवानाच मिळाल्यासारखा तो वागतोय. परवा औषधं विकत घ्यायला दुकानात गेलो तर तिथेही ह्यानं ''मी नाही, ही पेशंट आहे'' असं त्या दुकानदाराला सांगितलं. उगाचच. त्याचं पैसे मिळवणं यथातथाच असतं. कधी मिळतात, कधी नाही. नियमित पगार असा माझाच. पूर्वी त्यामुळे पैसे हवे असले की तरी तो मला थोडाफार मान द्यायचा. आता तो मला घरात राहू देतोय हेच त्याचे माझ्यावर मोठ्ठे उपकार असल्यानं मी त्याला पैसे तरी द्यायलाच हवेत, आणि तो ते घेतो हेच माझं नशिब; असं मी मानायला हवं आहे त्याला. नवराबायकोमध्ये पैशांबाबत 'हे तुझं, हे माझं' असं असू नाही, हे मलाही पटतं, पण आता सापडेल त्याक्षणी मला टोचून बोलायचं तो सोडत नाही. मुख्य म्हणजे आता त्याच्या लेखी माझी किंमतच संपलेली आहे, महत्त्वाची गोष्ट म्हणजे आता त्याला माझ्यात तसा रसच नाही, तो माझ्या अंगाला साधा हातसुद्धा लावत नाही. असा लांबून जातो, भीती वाटते म्हणे त्याला.''

सुनंदा हे ऐकून खिन्नपणे हसली.

कुठूनही काय, आपल्या नशिबाची दु:खं कुठे जातच नाहीत.

हेमंतला एच आय व्ही असल्याचं कळल्यापासून दोन वर्ष

झालेली होती. सुरवातीला बरेच दिवस त्यानं सुनंदाला याचा पत्ता लागू दिलेला नव्हता. तो कुणाकडे तरी दवाखान्यात जातो, हे तिला माहीत होतं, औषधं घेण्याची आठवणही सुनंदाच करे. पण 'कशाची औषधं, का घ्यायची, हे मात्र कुणी तिला सांगत नसे. डॉक्टरांकडे जाताना सोबत म्हणून तो भावाला घेऊन जात असे. तिचीही तपासणी करून घ्यायला डॉक्टरांनी सांगितली असणार. या माणसानं तिला काहीही न सांगता 'तुला सध्या अशक्तपणा वाटतोय, तुझं रक्त आपण तपासून घेऊ' असं सांगून दुसऱ्याच एका खाजगी प्रयोगशाळेत नेऊन तिची तपासणी करून घेतली. नवऱ्याच्या वागण्यातून तो काहीतरी लपवतो आहे ह्याची शंका सुनंदाला येत होतीच. तशात अचानकपणे त्यानं कंडोम वापरायला सुरूवात केली होती.

असं का करता, विचारल्यावर त्यानं 'उगीचच' असं उत्तर दिलं तेव्हा सुनंदा चपापली. 'तुम्ही माझ्यापासून काहीतरी लपवताय,' असं ती त्याला सरळच म्हणू लागली. त्यानं टाळायचा प्रयत्न केला पण सुनंदा डॉक्टरांकडे 'मी बरोबर येते' म्हणून मागे लागली. तेव्हा डॉक्टरांना मध्ये घालून सुनंदाला सांगण्यात आलं.

''हे तुम्हा बायकांचं मला काही कळत नाही.'' सुनंदाची कथा ऐकता ऐकता वैशाली म्हणाली, '' टेस्ट केल्यावर रिपोर्ट स्वत: नकोस का बघायला तू. तुला कळणार नाही असं कसं होईल? अशिक्षितासारखं कसं ग वागलीस अग तू?''

''तुझं म्हणणं बरोबर आहे वैशू , पण गेल्या अनेक वर्षात घरच्या माणसांपलीकडे मला फारसं कुणाशी गप्पा मारायला, जगात काय चाललंय ते बघायला वेळच मिळालेला नाही. नाही आलं,माझ्या लक्षात त्यामुळे.''

''तू घरातच असतेस का, नोकरी वगैरे काही करत नाहीस? निदान कुठे महिलामंडळ, भिशी गट, काही नाही?''

''मी नोकरीबिकरी करायचीच नाही अशी त्यांनी लग्न ठरवताना अटच घातलेली होती. नोकरी करायची नव्हती, तरी काम असायचंच ग. घरात दीर, नणंदा, सासू अशी दहा माणसं होती. सासूबाईंचा खाद्यपदार्थ करून विकण्याचा घरगुती धंदा आहे. जेवणाचे डबे द्यायचे असतात. स्वैपाकालाच केवढा वेळ जातो. मी नोकरी करायची नाही तर दुसरं काय करायचं, याचं उत्तर त्यांनी आधीच तयार केलेलं होतं, आम्हाला ते माहीत नव्हतं. एका अर्थी फसवलीच गेले मी. सुरुवातीला हे करण्यापेक्षा मी नोकरी करू का, असं एकदा मी विचारलंही होतं, पण नको म्हणाल्या ग सासूबाई! तेही जाऊदे, पण विचित्र माणसं आहेत अगं ही. सहज साधं बोलतानाही लागट टोचून बोलायची या घराची पद्धतच आहे. आपण सोडून सगळे मूर्ख अशीही ठाम समजूत आहे. त्यासाठी घरात आलेली सून हे हमखास गिऱ्हाईक होतं. आता जुनं झालं ते, सरावले आहे मी सगळ्याला. वाईट याचं वाटतं की या सगळ्यात हेमंतचा तसा काही आधार कधीच मिळाला नाही, किंबहुना तो स्वत:ही तसाच वागतो. ''त्याचं काय झालंय, शाळाकॉलेजापासून तो हुशार मानला गेलेला आहे, त्यामुळे घरादारानं त्याला लाडावून ठेवलेलं आहे. आता एचआयव्ही झाल्यावर कळतंय त्याला, भावाबहिणींचं प्रेम कसं आटलंय ते. आता म्हणतो तो तसं. आधी काय व्हायचं, तो एका खाजगी कॉलेजमध्ये शिकवायचा. पगार तसा चांगला होता, त्याच्या जिवावर घर चालत असल्यानं सगळे त्याचं सतत कौतुक करत. त्यालाही ते करून घ्यायचीच सवय झालेली होती.''

''आणि मूलबाळ?''

''तेवढीच एक गोष्ट बरीय बाई. या सगळ्यात आणखी गुंतागुंत वाढवायला मूलबाळ नाही मला. लग्नानंतर लगेच एकदा दिवस राहिले होते, तेव्हा सासूनं गर्भपात करून घ्यायला लावला होता. त्यानंतर काही दिवस मी गोळ्या घ्यायचे संतती नियमनाच्या, पण नंतर त्या थांबवल्या,

तरी दिवस काही राहिलेच नाहीत मला. त्यासाठीचे उपचार आत्ता सुरूच झालेले होते, तेवढ्यातच हे एचआयव्हीचं प्रकरण उपटलंय. '' वैशाली हे ऐकून थक्क झाली. सुनंदाला स्वत:ला एचआयव्ही नव्हता म्हणून तिची परिस्थिती बरी म्हणावी अशी नव्हती. ''पण आता हे कळल्यावर तू विचारलं नाहीस का, की असं झालंच कसं? फसवणूक आहे ही माझी.'' ''फसवणूक तर आहेच ग, ते मी आधीच म्हणाले नाही का. बायकोची फसवणूक करायला एचआयव्ही असायला लागत नाही, त्याशिवायही करता येते.

आपल्या संस्कृतीत बाईची फसवणूक करणं ही इतकी सामान्य बाब आहे, की ती कुणी मोजतही नाहीत. हे एचआयव्हीचं कळल्यापासून, नाही म्हणायला ते जरा नरमलेत. पण तेवढंच. आता सगळीकडूनच अडचणी आल्यात, नोकरी सुटलीय, दवाखान्याचा, तपासण्यांचा, हे असं हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागतं अधूनमधून, तो खर्च वाढलाय. आता सासूबाईंचा धंदाच मी वाढवलाय. जास्त मागण्या घ्यायच्या, पुरवायच्या. कारण त्याशिवाय काहीच उपाय नाही. आता असं होतं की त्यांच्यावर वाईट वेळ आली त्याचवेळी मी उलटा आवाज काढून जाब विचारायचा हेही वाईट दिसतं ग.'' आपल्या तक्रारींचा पाढा वाचत सुनंदा म्हणाली आणि मग एकदम वळून तिनं विचारलं, ''पण काय ग, वैशू, तुला झालाच कसा हा आजार?''



वैशालीला त्या प्रश्नाचं हसूच आलं. तिला वाटलं, 'कशी गंमत आहे ना! हिच्या नवऱ्याला कसा झाला आजार हा प्रश्न मी विचारला नाही, तरी माझ्या मनात त्यानं कुठेतरी बाहेर शेण खाल्लं असंच येतं. मला मात्र ती विचारते. कारण मी असं करणार नाही अशी खात्री अगदी नसेल तरी शंका तरी आहे. एवढी एक गोष्ट त्यातल्यात्यात समाजाच्या दृष्टीनं तरी बायकांच्या बाजूनं असते. पुरुषांना तर आपण तेवढीही जागा ठेवत नाही. बायका काय आणि पुरुष काय, परिस्थितीचे गुलाम असतो आपण.'

''मला माहीत नाही,'' तिनं सुनंदाला उत्तर दिलं. ''पण रक्त काढताना कधीतरी झालेलं असणार मला इन्फेक्शन. कारण दुसरं कुठलंच कारण नाही. नाही म्हणायला, सौरभच्या वेळी माझं सिझर झालं होतं आणि तेव्हा मला रक्तही भरलं होतं.''

''एचआयव्हीला औषधं आहेत वगैरे कळलंय मला वैशू, पण तू सांग, किती वर्ष मरण पुढे ढकलता येतं ग, या औषधांनी?'' सुनंदानं विचारलं.

वैशाली तिच्याच विचारात होती.

प्रयोगशाळेतच पण स्वागतकक्षात बसायचं, रिपोर्टस् कॉम्प्युटरमध्ये टाईप करायचे, अशी कोरडी कामं मला देण्यात आलेली आहेत. तसं कुणी दाखवत नाही, पण सगळेच माझ्याशी जरा वेगळे वागतात, असं मला जाणवतं. मी आमच्या विभागप्रमुखांकडे जाऊन तक्रारही केली, पण उपयोग झाला नाही. 'तुम्हाला हे काम पसंत नसेल तर तुम्ही सोडू शकता' असं ते म्हणाले. मी होऊन नोकरी सोडली तर त्यांना हवंच आहे, असं त्यांच्या वागण्यावरून जाणवतं. मग मी गप्पच बसले. नोकरी सोडणं तर आत्ता शक्यच नाही. हॉस्पिटलातला हा प्रकार तर घरी दुसरा. विलासनं माझ्याशी या विषयावर काही भांडण केलं असं नाही, पण तोही माझ्याशी त्रयस्थपणे वागू लागलाय. त्याचं माझ्यावर प्रेम आहे की काय, अशी शंका तरी त्यावेळी मला यायची, आता तीही येत नाही. मला रक्त काढताना लागण झाली असेल, असं मी त्याला म्हणाले तर तो काय म्हणाला माहीत आहे, आता काय, तू जे म्हणशील ते खरं!''



''खरंच?''

''एरवी आजार म्हणून मला आता काही भीती वाटत नाही. देशपांडेसरांकडे अनेक पेशंट असतात, रोजचेच. आता फार चांगले उपचार निघालेले आहेत, ती औषधं स्वस्तही मिळतात, सरकारी इस्पितळात फुकटही मिळतात. माझी नोकरीदेखील जाणार नाही, पूर्वी या आजारात लोकांना वाटायची तशी मरणाची भीती आता अजिबात वाटत नाही. हे सगळं खरंच आहे; पण म्हणून माझ्यासमोर एचआयव्हीनं उभे केलेले प्रश्न संपलेले आहेत असं नाही. आता घरात किंवा नोकरीत स्वत:चं कुठलंही मत आपण आग्रहानं मांडू शकणार नाही, असं मला दिसायला लागलंय. माझ्याकडून–मी आधी करत होते, फार कौशल्यानं करत होते–ते रक्त काढण्याचं काम आता काढून घेतलेलंय.

''खरंच म्हणजे, हे कळल्यापासून माझ्याजवळ तो आलेलाच नाही.'' मी एकदा म्हणाले तेव्हा म्हणाला, 'मी कंडोम वापरून तुझ्याशी काही करणार नाही. मी माझा वेगळा रस्ता शोधीन. मला तुझ्याशी काही नकोच आहे. सौरभकडे पाहून मी गप्प बसलेलो आहे, पण तू ते समजून घ्यायला पाहिजे. मी काही अजून म्हातारा झालेलो नाही, आयुष्यात यापुढे सुखच नाही, हे काही आपल्याला सहन व्हायचं नाही'. आता बोल.''

सुनंदा हे ऐकून काहीच बोलू शकली नाही. वैशालीच पुढे म्हणाली, ''त्यानं हे गाव सोडून जाण्याचाही विचार केला आहे. परवा त्याला कुणाशी फोनवर बोलताना ऐकून मीच दचकले, तो मला एचआयव्ही.असल्याबद्दलच बोलत

होता. त्याला नाही हेही सांगत होता. माझ्याशी लग्न करून तो फसला आहे, असंही तो सांगत होता. बोलण्याचा सूर लाडाचा होता. कुणाशी बोलतोयस, असं मी विचारलं तर तू विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर मी देऊ लागत नाही, म्हणाला, आजवर मला असं उत्तर देण्याची टाप नव्हती त्याची. ''

''खरंय तुझं म्हणणं, आजवर नसलेली शामत तुला एचआयव्ही आहे असं कळल्यानं त्यांना येते पण आमच्या घरी मी असं म्हणू शकत तर नाहीच, उलट, खरं प्रेम असेल, तर एखाद्या बाईनं नवऱ्याचा आजार घ्यायलाही तयार व्हायला हवं, असं मलाच ऐकवलं जातं. ''

काही क्षण कुणीच काही बोललं नाही; मग साडी नीट करत सुनंदा उठली.

''चल, जाऊया परत, हे वाट बघत असतील. एव्हाना मी त्यांना सोडून पळून गेले असा गोंधळही सुरू झालेला असेल.''

'' चल, मी येते तुझ्याबरोबर त्यांना भेटायला.''

''ए, नको. अग, कशाला?''

''अग चल ग, जरा गंमत करू.'' दोघीजणी एकत्र निघाल्या, सहजच हातात हात घालून.

सुनंदाच्या अंदाजाप्रमाणे हेमंतराव संतापलेलेच होते. ''या, बरं झालं लवकर आलात, मला वाटलं, नवरा मेल्याचं कळल्यावरच याल.'' अशी कुजकी तोफ त्यानं डागलीच. सुनंदा काहीच बोलली नाही. वैशालीनंच पुढे होत स्वत:ची ओळख करून दिली. ती याच हॉस्पिटलमध्ये नोकरी करते, 'काही मदत लागली तर सांगा.' असं म्हणाली. तेव्हा हेमंतचा पारा जरा उतरला. तो त्याच्या हॉस्पिटलबाबतच्या तक्रारी सांगायला लागला. त्याला जरा नीट बोलताना पाहून वैशालीनं शांतपणे स्वत:च्या एचआयव्हीबद्दल त्याला सांगितलं. तिच्या नवऱ्याला नसल्याबद्दलही सांगितलं. त्याच्याबद्दल तिला माहीत असल्याचं मात्र ती काहीच बोलली नाही. पण हेमंतला ते जाणवलं. त्याला मनातल्या मनात सुनंदाचा रागही आला. सुनंदानंच मैत्रिणीला सांगितलं असणार. उघड मात्र तो म्हणाला. ''अरे वा! काय बोलताय,''

''ही काय अरे वा म्हणायची गोष्ट आहे?''

ती काहीशी दचकून म्हणाली.

''नाही. अरे वा, म्हणजे चांगली मैत्रिणींची जोडी आहे. तुमच्या घरी तसं तर आमच्या घरी असं. नाही का?'' तिला माहीत असल्याचं आपल्याला कळलंय हे दाखवत हेमंत म्हणाला.

''खरंय, तुमचं म्हणणं, पण बरं का हेमंतराव, असं किंवा तसं कसंही असलं तरी फरक पडत नाही. मुद्दा बाई असण्याचा आणि पुरूष असण्याचाच उरतो. एचआयव्हीनं त्यात फरक पडत नाही. एचआयव्हीच्या निमित्तानं मला हे शिकायला मिळालंय आणि मी ते सुनंदालाही सांगितलंय. आता प्रश्न तुमचा आहे, तुम्ही यातून काही शिकणार की नाही, ते तुम्ही ठरवा.''

हेमंतला यावर काहीही बोलायला सुचत नाही आहे, हेही तिला जाणवलं. ती निघाली. क्षणभर सुनंदापाशी गेली. तिला काहीसं जवळ घेत तिचा हात हातात घेऊन तिनं अलगद दाबला, आणि मनापासून गोड हसून हेमंतला हात करून हसऱ्या मुद्रेनंच वैशाली त्या खोलीतून बाहेर पडली.



प्रयास ही आरोग्य, ऊर्जा, शिक्षण व पालकत्व आणि संसाधने व उपजीविका या क्षेत्रांत काम करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. प्रयासचा आरोग्य – गट प्रामुख्याने लैंगिकता आणि एड्सच्या संदर्भात काम करतो.

या पुस्तकातील साहित्याचा व्यावसायिक सोडून इतर कोणत्याही कारणासाठी जितका जास्तीत जास्त उपयोग होईल तेवढा हवाच आहे. तेव्हा या पुस्तिकेचा अगदी निःसंकोचपणे वापर करा. असं करताना जर आम्हाला कळवलंत तर अधिक चांगलं.

**ही पुस्तिका नेदरलँड येथील ग्रोनिंगन विद्यापीठाच्या पॉप्युलेशन रिसर्च सेंटर व एरिक ब्युमिंक फाऊंडेशन यांच्या आर्थिक साहाय्यातून तयार झाली आहे.**